# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. १९/०९/२००८

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक १९/०९/२००८ रोजी सभा सुचना क्र. १० दि. १५/०९/२००८ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स | -- | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | -- | सदस्य |
| ३) | ॲड. एस.ए. खान | -- | सदस्य |
| ४) | श्री. मिलन वसंत म्हात्रे | -- | सदस्य |
| ५) | सौ. शानु गोहिल | -- | सदस्या |
| ६) | सौ. सुनिता कैलास पाटील | -- | सदस्या |
| ७) | सौ. नयना गजानन म्हात्रे | -- | सदस्या |
| ८) | श्री. गणेश गोपाळ शेटटी | -- | सदस्य |
| ९) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | -- | सदस्य |
| १०) | श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल | -- | सदस्य |
| ११) | श्री. शरद केशव पाटील | -- | सदस्य |
| १२) | श्री. प्रकाश पांडुरंग ठाकूर | -- | सदस्य |
| १३) | सौ. ज्योत्स्ना हसनाळे | -- | सदस्या |
| १४) | श्री. प्रशांत भगवंतराव पालांडे | -- | सदस्य |
| १५) | श्री. टेरी पॉल परेरा | -- | सदस्य |
| १६) | श्री. राजु भोईर | -- | सदस्य |

**गैरहजर सदस्य – निरंक**

**उपस्थित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. बालाजी खतगावकर | -- | उपायुक्त (मु.) |
| २) | श्री. शिवाजी बारकुंड | -- | शहर अभियंता |
| ३) | श्री. श्रीकांत मोरे | -- | मुख्य लेखाधिकारी |
| ४) | श्री. सुनिल यादव | -- | चौकशी अधिकारी |
| ५) | श्री. गोविंद परब | -- | सहा. आयुक्त, सामान्य प्रशासन |
| ६) | श्री. क्लासो फर्नांडीस | -- | मुख्य अग्निशमन अधिकारी |
| ७) | श्री. स्वप्नील सावंत | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. ३ |
| ८) | श्री. गणेश पाटील | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. ४ |
| ९) | श्री. मनोहर म्हात्रे | -- | विभाग प्रमुख, जाहिरात |
| १०) | श्री. राज घरत | -- | सिस्टीम ॲनालीस्ट, नागरी सुविधा केंद्र |
| ११) | श्री. संजय दोंदे | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. २ |
| १२) | श्री. बाबुराव वाघ | -- | विभाग प्रमुख, वाहन विभाग |
| १३) | श्री. एन. के. सोनार | -- | शिक्षण अधिकारी |
| १४) | श्री. नागेश इरकर | -- | विभाग प्रमुख, वन विभाग |

**गैरहजर अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. ओमप्रकाश दिवटे | -- | उपायुक्त अतिक्रमण |
| २) | श्री. संभाजी पानपट्टे | -- | उपायुक्त, आरोग्य विभाग |
| ३) | श्री. दादासाहेब आ. पाटील | -- | मुख्य लेखापरिक्षक |
| ४) | श्री. भारत जगताप | -- | सहा. नगररचनाकार |
| ५) | श्री. शरद बेलवटे | -- | उप मुख्य लेखाधिकारी |
| ६) | श्री. संजय तायशेटे | -- | विभाग प्रमुख, परवाना |
| ७) | श्री. विजय पाटील | -- | सहा. आयुक्त, परिवहन विभाग |
| ८) | श्री. संजय गोखले | -- | सहा. आयुक्त, सामान्य प्रशासन |

| | | | |
|---|---|---|---|
| ९) | श्री. नरेंद्र पाटील | -- | विभाग प्रमुख, भांडार |
| १०) | श्री. संदिप शिंदे | -- | मुख्य स्वच्छता निरीक्षक, आरोग्य विभाग |
| ११) | श्री. रामचंद्र असोदेकर | -- | विभाग प्रमुख, सुवर्ण जयंती |
| १२) | श्री. राजकुमार कांबळे | -- | मुख्य स्वच्छता निरीक्षक, आरोग्य विभाग |
| १३) | श्री. दादासाहेब खेत्रे | -- | विभाग प्रमुख, जकात |
| १४) | श्री. नरेंद्र चव्हाण | -- | जनसंपर्क अधिकारी |
| १५) | सौ. सई वडके | -- | विधी अधिकारी |
| १६) | श्री. किरण राठोड | -- | विभाग प्रमुख, अतिक्रमण विभाग |

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी व कर्मचारी वर्ग आपले सर्वांचे मी हार्दिक स्वागत करुन ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडण्यास सहकार्य करावे अशी मी सर्वांना विनंती करतो. आणि सचिवांनी सभेला सुरुवात करावी असे मी विनंती करतो.

(नगरसचिव यांनी विषय पत्रिकेचे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५६, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० (४) अन्वये स्थायी समितीच्या निम्मे (आठ) सदस्यांची निवृत्तीकरिता चिठ्ठ्या टाकून निवृत्त करणेबाबत. याबाबत शासनाचे परिपत्रक आहे. याचे मी वाचन करतो.

(नगरसचिवांनी परिपत्रकाचे वाचन केले.)

## //परिपत्रक//

राज्यातील महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीकरिता स्थायी समिती व अन्य समित्या सदस्य संख्या नेमणूक केल्या जातात. स्थायी समिती निवडणूक समिती प्रत्येक वर्षी निवृत्त होतात. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० या चार मधिल तरतुदीनुसार पहिल्या वर्षी निवृत्त होणाऱ्या सदस्यांची नावे स्थायी समिती सभापती ठरावातील अशा पद्धतीत चिठ्ठ्या टाकून ठरण्यात येईल. अशा प्रकारच्या चिठ्ठ्या टाकून निवृत्त होणाऱ्या सदस्यांची नावे निश्चित करताना अडचणीत आणणाऱ्या कार्यपद्धतीत पुरेसे पारदर्शक नसल्याबाबतची तक्रारी शासनास प्राप्त झालेली आहे. याबाबतची पारदर्शकता रहावी आणि होणाऱ्या तक्रारीला वाव राहू नये यास्तव अशा सुचना देत आहेत की, महासभेत अडचणीत येणाऱ्या सर्व कारवाईचे जवळून चित्रिकरण करण्यात यावे व ते संग्रहीत करण्यात यावे तसेच सभेचे प्रत आयुक्तांनी स्वतःच्या ताब्यात ठेवावी.

**उपसचिव**
**महाराष्ट्र शासन**
**बबन खान यांचे पत्र**

१६ सदस्य आहेत. त्यांच्या नावाच्या चिठ्ठ्या तयार केल्या आहेत. पेपर सारखेच आहेत. कोणाला तपासून घ्यायचे आहे तर घ्या. मी नावे वाचून दाखवतो. (१६ सदस्यांची नावे वाचून दाखवली) सन्मा. सदस्य प्रशांत पालांडे यांचे लेखी पत्र आलेले आहे. मी आपल्याला वाचून दाखवतो. (पत्राचे वाचन केले.) या डब्यामध्ये १६ सदस्यांच्या नावाच्या चिठ्ठ्या टाकलेल्या आहेत. आपल्या महानगरपालिकेतल्या शाळेतली लहान मुले आणलेली आहेत. त्यातला प्रत्येक एक मुलगा एक चिठ्ठी काढेल. ज्यांची चिठ्ठी निघेल ते सदस्य मा. स्थायी समितीतून निवृत्त होतील.

१) कु. मंजुनाथ प्रकाश सिंह, इयत्ता चौथी, मराठी मिडीयम.
२) कु. राजश्री उदयसिंग माने, इयत्ता चौथी, मराठी मिडीयम.
३) कु. विजय विश्वनाथ स्वामी, इयत्ता चौथी, मराठी मिडीयम.
४) कु. आरती सुभाष गारगोडे, इयत्ता चौथी, मराठी मिडीयम.
५) कु. रोशन गोपाल जोशी, इयत्ता चौथी, मराठी मिडीयम.
६) कु. मारुती नामदेव काकडे, इयत्ता चौथी, मराठी मिडीयम.
७) कु. भोलाप्रसाद गुप्ता, इयत्ता चौथी, हिंदी मिडीयम.
८) कु. प्रमोद गजानन राठोड, इयत्ता चौथी, मराठी मिडीयम.

**नगरसचिव :-**

८ चिठ्ठ्या काढलेल्या आहेत. मी जी चिठ्ठी उघडेन ते सदस्य निवृत्त होतील.

१) श्री. राजु भोईर
२) श्री. शरद केशव पाटील
३) श्रीम. म्हात्रे नयना गजानन
४) श्री. शेट्टी गणेश गोपाळ
५) श्री. शफीक अहमद खान

६) श्री. प्रशांत भगवंतराव पालांडे
७) श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल
८) सौ. ज्योत्स्ना हसनाळे

**मा. सभापती :-**

निवृत्त झालेल्या सभासदांचे मी नाव घोषीत करीत आहे.

१) श्री. राजु भोईर
२) श्री. शरद केशव पाटील
३) श्रीम. म्हात्रे नयना गजानन
४) श्री. शेट्टी गणेश गोपाळ
५) श्री. शफीक अहमद खान
६) श्री. प्रशांत भगवंतराव पालांडे
७) श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल
८) सौ. ज्योत्स्ना हसनाळे

**नगरसचिव :-**

जे सदस्य राहीले त्यांची नावे मी घोषीत करतो.

१) सौ. शानु गोहिल
२) श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे
३) श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील
४) सौ. सुनिता कैलास पाटील
५) श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स
६) श्री. प्रकाश पांडुरंग ठाकूर
७) श्री. टेरी पॉल परेरा
८) श्री. मिलन वसंत म्हात्रे

पुढचा विषय घेतो.

**प्रकरण क्र. ५६ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० (४) अन्वये स्थायी समितीच्या निम्मे (आठ) सदस्यांची निवृत्तीकरिता चिठ्ठ्या टाकून निवृत्त करणेबाबत.

**ठराव क्र. ५२ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(४) अन्वये स्थायी समितीच्या १६ सदस्यांपैकी निम्मे (आठ) सदस्यांची निवृत्तीकरिता चिठ्ठ्या टाकून निवृत्त करणे आवश्यक असल्याने एकूण १६ सदस्यांच्या नावाच्या चिठ्ठ्या बनवून एका पेटीमध्ये टाकण्यात आल्या. चिठ्ठ्या काढणेसाठी महानगरपालिका शाळेतील लहान विद्यार्थ्यांच्या बोलविण्यात आले होते. एकूण १६ चिठ्ठ्यांपैकी एक एक करून लहान मुलांच्या हस्ते आठ चिठ्ठ्या काढण्यात आल्या असता खालील सदस्यांच्या नावांच्या चिठ्ठ्या निघाल्या.

१) श्री. एस.ए. खान
२) श्री. ओमप्रकाश अग्रवाल
३) श्री. शरद पाटील
४) श्री. प्रशांत पालांडे
५) श्री. राजु भोईर
६) श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे
७) श्रीम. नयना गजानन म्हात्रे
८) श्री. गणेश गोपाळ शेट्टी

वरीलप्रमाणे स्थायी समिती मधून निम्मे आठ सदस्य माहे सप्टेंबर २००८ अखेर निवृत्त होत असल्याचे जाहिर करित आहे.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५७, वार्षिक जमा – खर्चाचा आढावा घेणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १४/०८/२००८ रोजीचे तहकूब प्रकरण क्र. ४०)

**एस. ए. खान :-**

सन २००७-०८ चे मंजुर अंदाजपत्रकानुसार सन २००७-०८ चे वार्षिक अंदाजपत्रकिय तरतुद व त्यानुसार झालेली जमा व त्या प्रमाणात झालेला खर्च यांचा संक्षिप्त गोषवाऱ्याचा आढावा घेउन सदर सभा त्याचे पुर्ण अवलोकन करून सन २००७-०८ च्या वार्षिक अंदाजपत्रकिय तरतुद व त्यानुसार झालेली जमा व त्याचप्रमाणात झालेला खर्च यांस ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**शानु गोहिल :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. वाचून कायम करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ५७ :-**

वार्षिक जमा – खर्चाचा आढावा घेणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १४/०८/२००८ रोजीचे तहकूब प्रकरण क्र. ४०)

**ठराव क्र. ५३ :-**

सन २००७-०८ चे मंजुर अंदाजपत्रकानुसार सन २००७-०८ चे वार्षिक अंदाजपत्रकिय तरतुद व त्यानुसार झालेली जमा व त्या प्रमाणात झालेला खर्च यांचा संक्षिप्त गोषवाऱ्याचा आढावा घेउन सदर सभा त्याचे पुर्ण अवलोकन करून सन २००७-०८ च्या वार्षिक अंदाजपत्रकिय तरतुद व त्यानुसार झालेली जमा व त्याचप्रमाणात झालेला खर्च यांस ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. एस. ए. खान.     अनुमोदक :- श्रीम. शानु गोहिल.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

त्रैमासिक जमा खर्चाचा आढावा घेणेबाबत.

**एस. ए. खान :-**

सन २००७-०८ चे मंजुर अंदाजपत्रकानुसार माहे एप्रिल २००८ ते जुन २००८ अखेर अंदाजपत्रकिय तरतुद व त्यानुसार झालेले जमा व त्या प्रमाणात झालेला खर्च यांच्या संक्षिप्त गोषवाऱ्याचा आढावा घेउन सदर सभा त्याचे पुर्ण अवलोकन करून माहे एप्रिल २००८ ते जुन २००८ या त्रैमासिक जमा खर्चास ही सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे.

**शानु गोहिल :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ५८ :-**

त्रैमासिक जमा खर्चाचा आढावा घेणेबाबत.

**ठराव क्र. ५४ :-**

सन २००७-०८ चे मंजुर अंदाजपत्रकानुसार माहे एप्रिल २००८ ते जुन २००८ अखेर अंदाजपत्रकिय तरतुद व त्यानुसार झालेले जमा व त्या प्रमाणात झालेला खर्च यांच्या संक्षिप्त गोषवाऱ्याचा आढावा घेउन सदर सभा त्याचे पुर्ण अवलोकन करून माहे एप्रिल २००८ ते जुन २००८ या त्रैमासिक जमा खर्चास ही सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. एस. ए. खान.     अनुमोदक :- श्रीम. शानु गोहिल.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५९, राज्य शासनाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांना नगरपालिका प्रशासन संचालनालय मार्फत देण्यात येणारा निधी ॲक्सीस बँक मार्फत वितरीत करणे. बँक खाते उघडणेबाबत.

**शानु गोहिल :-**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग क्र. बविआ-१००८/प्रक्र.३५/नवि-४ दि. १९/०३/२००८ चे शासन निर्णयानुसार राज्य शासनाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांना नगरपालिका प्रशासन संचालनालय मार्फत देण्यात येणारा निधी ॲक्सीस बँक मार्फत वितरीत करण्याबाबत शासन निर्णयाची प्रत जोडली आहे. ॲक्सीस बँक यांनी दि. २४/०३/२००८ चे पत्राप्रमाणे बँक खाते उघडणेबाबत मागणी केली आहे.

ॲक्सीस बँक ही खाजगी बँक आहे. मा. संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय यांचे मार्फत स्थानिक स्वराज्य संस्थांना शासनाच्या १२ व्या वित्त आयोग व वैशिष्ट्यपुर्ण कामासाठी उपलब्ध होणारा निधी ॲक्सीस बँकेत ठेवणेकरिता शासनाने परवानगी दिली आहे. या परवानगी व दिलेल्या अटी शर्ती यांस अधीन राहून ॲक्सीस बँकेच्या मिरा भाईंदर शहराच्या जवळ असलेल्या शाखेमध्ये खाते लवकरात लवकर उघडण्यास ही सभा मंजुरी देत आहे

**सुनिता पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदर ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ५९ :-**

राज्य शासनाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांना नगरपालिका प्रशासन संचालनालय मार्फत देण्यात येणारा निधी ॲक्सीस बँक मार्फत वितरीत करणे. बँक खाते उघडणेबाबत.

**ठराव क्र. ५५ :-**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग क्र. बविआ-१००८/प्रक्र.३५/नवि-४ दि. १९/०३/२००८ चे शासन निर्णयानुसार राज्य शासनाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांना नगरपालिका प्रशासन संचालनालय मार्फत देण्यात येणारा निधी ॲक्सीस बँक मार्फत वितरीत करण्याबाबत शासन निर्णयाची प्रत जोडली आहे. ॲक्सीस बँक यांनी दि. २४/०३/२००८ चे पत्राप्रमाणे बँक खाते उघडणेबाबत मागणी केली आहे.

ॲक्सीस बँक ही खाजगी बँक आहे. मा. संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय यांचे मार्फत स्थानिक स्वराज्य संस्थांना शासनाच्या १२ व्या वित्त आयोग व वैशिष्ट्यपुर्ण कामासाठी उपलब्ध होणारा निधी ॲक्सीस बँकेत ठेवणेकरिता शासनाने परवानगी दिली आहे. या परवानगी व दिलेल्या अटी शर्ती यांस अधीन राहून ॲक्सीस बँकेच्या मिरा भाईंदर शहराच्या जवळ असलेल्या शाखेमध्ये खाते लवकरात लवकर उघडण्यास ही सभा मंजुरी देत आहे

**सुचक :- श्रीम. शानु गोहिल.　　　　अनुमोदक :- श्रीम. सुनिता पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग-१ व वर्ग-२ या पदांना वाहन प्रतिपूर्ती भत्ता देणेबाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, हा जो विषय आणलेला आहे. स्थायी समितीने ज्यावेळी पहिल्यांदा ठराव केला आणि स्थायी समितीने ठराव केल्याप्रमाणे तुम्ही कर्मचाऱ्यांना पैसे दिले. काही कर्मचाऱ्यांनी गाड्या घेतल्या आणि आता त्या लोकांचे पैसे हे गेल्या चार महिन्यापासून बंद आहे. तर ही माहिती खरी आहे की खोटी आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

वर्ग-२ चे जे अधिकारी आहेत, स्थायी समितीच्या मान्यतेने त्यांना आपण दर महिन्याला १० हजार रु. वाहन भत्ता देत होतो. तो मा. आयुक्त साहेबांकडे निर्णयासाठी प्रलंबित आहे. आतापर्यंत या आर्थिक वर्षातले दिले. ही वस्तुस्थिती आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ज्यांनी स्थायी समितीमध्ये विषय पुन्हा पाठवला ओ.के., पण ज्यांनी ४ महिने पैसे का थांबवले?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

त्यांचे पेमेन्ट होईल. त्यांचा निर्णय होईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

कधी निर्णय होईल?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

साहेब, निर्णय होईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, स्थायी समितीने सभा निर्णय घेतलेला नाही. स्थायी समितीला पण प्रशासनाने आणि आयुक्त साहेबांनी गोषवारा दिलेला होता. त्याप्रमाणे स्थायी समितीने निर्णय घेतलेला आहे. निर्णय पण घेतलेला नाही. काय म्हंटले ह्याच्यामध्ये पण शासन निर्णय क्रमांक तोच आहे आणि ह्याच्यामध्ये पण शासन निर्णय क्रमांक तोच आहे. म्हणजे स्थायी समितीला प्रशासनाने जो गोषवारा दिला तो मंजूर करतो आणि परत प्रशासन त्या ठरावाला पैस देत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, माझी एक तक्रार आहे. तो शासन निर्णय जो आहे त्याचा दुरुपयोग दुसऱ्या ठरावात केला गेला. त्याच्यामध्ये जे अधिकारी कार्यालय सोडून बाहेर फिरतात. ठाणे महानगरपालिकेत ३-४ रिक्षा खाजगी घेतात. तुम्ही ठाणे महानगरपालिकेमध्ये होता. तेथे ६ हजार रु. पगार आहे, ८ हजार रु. पगार आहे आणि त्यांना वाहन प्रतिपूर्ती भत्ता १० हजार रु. आहे. जो माणूस कार्यालय सोडून बाहेर जाणार नाही. ते कुठच्या नियमात बसते. समोर राहणारा माणूस सुध्दा १० हजार रु. घेणार आणि आज परिस्थिती अशी आहे की, आपण सगळ्यांनी ह्याचा विचार केला पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

साहेब, हा निर्णय घ्यायला पाहिजे म्हणून स्थायी समितीमध्ये चर्चा व्हायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

आता तुमचे ऑक्ट्रॉयचे सगळे पैसे बंद आहे. सेस सुरु होईल. किती पैसे येतील याची गॅरन्टी नाही. जशी येईल तशी. कारण बंद नाही. आज आपला जो जमा-खर्च आहे, ह्या खर्चाचा ताळमेळ बसवताना तुम्हांला दोन-तीन महिने प्रॉब्लेम येणार आहे. मी तर त्याच्या पुढे जाउन बोलतो की, आमचे मानधन सुध्दा थांबेल ही परिस्थिती आहे. म्हणजे आज अननेसेसरी लाईटची बचत वगैरे हे सगळं आपल्याला बघितले पाहिजे. बाकीच्या लोकांना आवश्यक आहे ते देतो ना. ह्या ठरावामध्ये जे साईडवर फिरणारे आहे, त्यांना आपण देतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, विषय असा आहे की, मी फक्त पैसे द्यायचे की नाही हे म्हणत नाही. परंतु, प्रशासनाने आम्हांला मिस गाईड केले, असा माझा आरोप आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, श्री. सुदाम गोडसे हे आपल्या आयुक्त साहेबांकडे कामाला आहेत. हे कुठे फिरतात हे जरा मला सांगा. त्यांना कशाला दहा-दहा हजार रु. द्यायला पाहिजे. असे किती तरी अधिकारी आहेत जे खुर्च्या गरम करतात, बाहेर पडत नाहीत. बाहेरची दुनियादारी काय आहे ते माहित नाही. ए.सी. शिवाय त्यांना जमत नाही. मग त्यांना १०-१० हजार रु. कशाला द्यायला पाहिजे. साहेब, आपण बचत केली पाहिजे. आता जसे सांगितले की, ठाणे महानगरपालिकेमध्ये रिक्षा दिल्या, तसे रिक्षा बुक करा त्यांना कुठे जायचे असेल ते रिक्षाने जातील.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, महिन्याला अननेसेसरी कमित कमी ३ लाख रु. फुकट जातात. तुमच्याकडे भाड्याच्या गाड्या आहेत. समजा, इनकेस कोणाला अचानक जायचे आहे तर त्यांना भाड्याच्या गाड्या भरपूर आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, माझा प्रशासनावर आरोप आहे की, प्रशासन आम्हांला मिस गाईड करते आणि आमच्याकडून ठराव करुन घेतात. ह्याचे आम्हांला उत्तर द्या. कारण प्रशासनाने पहिला आम्हाला गोषवारा दिला होता त्याच्यामध्ये पण सेम शासन निर्णय क्रमांक होता आणि आता ही परत म्हणजे की, हा शासन निर्णय क्रमांक देय नाही. आणि तुम्ही प्रशासनाला गोषवारा दिला. त्याच्यात तुम्ही असे म्हंटले पाहिजे की, हे वाहनला द्यायचे आहे. आज महिन्याला ३ लाख रु खर्च होतात. जर, समजा तुम्ही भाड्याची गाडी आणली त्या गाडीला १९ ते २० हजार रु. आपल्याला द्यायला लागतील. आता ह्यांनी एक्झाम्पल सांगितले की, श्री. सुदाम गोडसे, आज ते आयुक्त साहेबांकडे सचिव आहेत. ते कुठे बाहेर जात नाही. समजा, त्यांची उद्या जर प्रभाग अधिकारी म्हणून बदली झाली. मग, तेव्हा त्यांना गाडी द्यायला लागेल.

**मिलन म्हात्रे :-**

पदानुसार आहे ना. ज्याचे पद आहे, त्यांना गाडी मिळणारच.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, मला विचारायचे आहे की, हा निर्णय आम्हीच घेतलेला का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हो. स्थायी समितीनेच घेतलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण निर्णय घेतलेला नाही. मागच्या हाउसला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

स्थायी समितीने निर्णय घेतलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मग असू द्या ना. स्थायी समितीने काहीही द्यावे. तो जी.आर. वाचा. स्थायी समितीच्या अनेक बाबतीत निर्णय आहेत.

**प्रशांत पालांडे :-**

खतगांवकर साहेब, आता या वर्गवारी कामाचे स्वरुप कोणी केलेले आहे? उदा. हरेश पाटील हे कार्यालयामध्येच बसून असतात, असा अर्थ होतो. श्री. श्रीकांत मोरे, श्री. किरण राठोड पण कार्यालयामध्ये बसलेले असतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

अतिक्रमण डिपार्टमेन्टचे इन्चार्ज आहेत ना. मग ते कार्यालयामध्ये कशाला बसतात?

**मा. सभापती :-**

सर्व जण कामाला जातात ना.

**प्रशांत पालांडे :-**

जातात तर गाडी नको का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मग ह्यांना गाडी नको का?

**मा. सभापती :-**

देतो ना.

**प्रशांत पालांडे :-**

आपण गाडी काढतो ना.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही त्यांना रिक्षा द्या. कुठे जायचे असेल तर ते रिक्षातून जातील. ह्यांचे १०-१० हजार रु. आणि ह्यांच्या गाड्या बंद करुन टाका.

**प्रशांत पालांडे :-**

मा. सभापती साहेब, माझे काय म्हणणे आहे की, आपणच हे दिलेले आहे. एखाद्या अधिकाऱ्याला हा भत्ता मिळतो म्हणून त्यांनी नविन गाडी खरेदी केली आहे. त्याचा इन्स्टॉलमेन्ट आज १० हजार रु. पडतो. आणि आज आपण अचानक काढून घेतले तर त्या गाडीचा इन्स्टॉलमेन्ट कसा काय भरणार?

**मा. सभापती :-**

त्यांना गाडीची जरुरत नाही.

**प्रशांत पालांडे :-**

आपण त्यांना दिलेले आहे ना. आपणच दिलेले आहे.

**मा. सभापती :-**

आपण आता रद्द करु शकतो.

**प्रशांत पालांडे :-**

असे जर मध्ये आणून रद्द केले तर ते कसे काय करणार? पुढचे कसे काय करणार?

**मा. सभापती :-**

गाडीची जरुरत नाही ते गाडी विकु शकतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, प्रश्न गाडी विकण्याचा नाही.

**मा. सभापती :-**

भाड्याने कुठेही लावू शकतात.

**प्रशांत पालांडे :-**

असे कसे? कार कुठे भाड्याने लागते का? आपणच घेतलेला निर्णय आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही निर्णय घेतलेला नाही.

**प्रशांत पालांडे :-**

स्थायी समितीने निर्णय घेतलेला.

**मिलन म्हात्रे :-**

असु द्या ना. मग त्या स्थायी समितीने उद्या सभागृह विकायचा निर्णय घेतला तर आम्ही त्याची ------ ओढायची का? सन्मा. सदस्य पालांडे साहेब, माझ्याकडे अख्ख्या वर्षाचा ठराव आहे. त्याच्यामध्ये पहिला एक ठराव आहे तो प्ले ग्राउंडचा निघाला. त्यानंतर हा ठराव वाहनांचा आहे ना. हे अधिकारी तुमचा जी.आर. नीट वाचा. त्यावेळेला स्थायी समितीच्या सर्व सदस्यांनी जर जी.आर. चे व्यवस्थित अवलोकन केले असते ना, तर तो ठराव झाला नसता.

**प्रशांत पालांडे :-**

खर्च कपात करायला दुमत नाही. पण, आपणच निर्णय घेतो, आपणच.....

**मिलन म्हात्रे :-**

सवालच नाही. दुसरे सभागृह येते ते ह्याच्याकरीताच येते. आता जसजशी परिस्थिती बदलणार त्याचे तुम्हांला मॉडीफिकेशन करायला लागणार आहे. उद्या पैसेच नसतील तर तुमच्या पगारात इतर भत्ते सगळे कमी करायला लागणार आहे.

**प्रशांत पालांडे :-**

आपले नगरसचिव रिक्षातून फिरायला पाहिजे असे आपले म्हणणे आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

मी तसे कुठे म्हंटले?

**प्रशांत पालांडे :-**

नाही. आता कोणी तरी म्हटले की रिक्षा भाड्याने घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, टी.एम.सी. मध्ये रिक्षा आहेत.

**नयना म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य पालांडे साहेब, तुम्ही असा गैरसमज करुन घेउ नका. त्यांनी काय सांगितले की, ठाणे महापालिकेमध्ये रिक्षा दिलेल्या आहेत आणि तिकडे आपले आयुक्त होते. जर त्यांना तो निर्णय माहित आहे, तसेच मी त्यांना सांगितले की, इकडे पण ह्यांना रिक्षा द्या.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, ठाण्याचे नगरसचिव हे रिक्षामध्ये येतात जातात.

**नयना म्हात्रे :-**

नगरसचिवांचा विषय मांडलेला नाही.

**प्रशांत पालांडे :-**

आहे ना.

**नयना म्हात्रे :-**

तुम्हाला बाकी लोकांची नावे दिसत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

ह्याच्यामध्ये आपल्याला कमी करायचे आहे आणि ते आपण कमी केलेले आहे. ज्यांचे ठेवायचे आहे. हे बघा श्री. हरेश पाटील, नगरसचिव हे पद वैधानिक पद आहे त्यामुळे तुम्हांला त्यांना गाडी द्यावीच लागणार आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सचिवांना वाहन अनुज्ञेय आहे. त्यामुळे त्यांची चर्चा करायची गरज नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, माझा प्रश्न अजुन अनुत्तरीत आहे. दुसरी गोष्ट अशी की, तुम्ही आम्हाला हा जो गोषवारा दिला. किती लोकांना ......

**मिलन म्हात्रे :-**

१४ लोकांचा आपण कमी करतोय.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही करताना, प्रशासनाने म्हणू द्या ना. साहेब, तुम्ही सांगा की, किती लोकांची वाहने कट करायची आहेत. त्यासाठी आपल्या महानगपालिकेला किती फायदा होणार आहे? आणि जर ह्या लोकांना गाडीची गरज लागली तर आपण त्यांना गाडी प्रोव्हाईड केली त्यासाठी किती खर्च येणार आहे. तुम्ही त्याचे कॅल्क्युलेशन कराना.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, मला दुसरी माहिती द्या.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, पण चार्ज कोणाकडे आहे?

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, जर ठेक्याने गाड्या घेतल्या. त्याला किती खर्च येतो. त्यांची आम्हाला माहिती द्याना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

अजित पाटील साहेब, दोन-तीन मुद्दे झाले. ह्याच्यामध्ये आपण किती लोकांना कमी करायचे आहे?

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, ज्यांना गाडीची गरज नाही. त्यांना देवू नका.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्या नयना म्हात्रे मॅडम, आपले सन्मा. सदस्य एस. ए. खान साहेब, ह्यांनी हा ठराव मागे मांडला होता. ह्यांनी पास केला.

**नयना म्हात्रे :-**

महापालिकेच्या वकीलाने सांगावे.

**एस. ए. खान :-**

मी महापालिकेचा वकील नाही ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य खान साहेब, मेरा कहनेका मतलब यह नही था। अगर आपको तकलीफ हुई तो मै मेरा शब्द वापस लेता हूँ। ऐसी बात नही है। लेकीन मेरे कहनेका मतलब ऐसा है की लास्ट टाईम आपने ही ठराव मांडा था ना.

**एस. ए. खान :-**

ठराव मांडा। लेकीन चर्चा हुआ उसमे ठराव मांडा ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

अभी इस ठराव के पिछे आपकी क्या राय है?

**एस. ए. खान :-**

गलत लेके आया है।

**मिलन म्हात्रे :-**

त्यांना बोलू द्या ना मी ठराव वाचतो ना.

**एस. ए. खान :-**

साहेब, कैसे है की, आज सभागृहने गलत सुचाया हुआ है। वह गलत है। जो लोग यही बैठकर रहते है, उनको निकाल दोना।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आप सभी बोलते है, हम ना नही बोलते है। हमने सवाल पुछा है। सन्मा. सदस्य खान साहब, ठराव आपने पढा है, आप जरा ध्यान से सुनो। इसमे भी परिपत्रक क्र. वही है और अभी जो गोषवारा दिया उसमे परिपत्रक क्र. २ है। वही सेम है। मतलब प्रशासनने हमको मिस गाईड किया की नही? प्रशासनने मिस गाईउ किया। प्रशासनने लिस्ट दी। अपने मन से तो लिस्ट मांडी नही गई। उसके बाद प्रशासनने चार महिने तक उसका बिल नही निकाला। किसके लिए किया मतलब स्टॅन्डीग कमिटी के डिसीजन को व्हॅल्यू है क्या? साहेब, आमचा स्पष्ट आरोप आहे की, तुम्ही आमच्या डिसीजनचा अनादर केलेला आहे आणि तुम्ही हे बिल का थांबवले? तुम्ही हा गोषवारा दिला तो गोषवारा कम्प्लीट नाही. तुम्ही गोषवारा करताना सांगायला पाहिजे होते की, हे सगळं आम्ही दिलेले आहे आणि ह्याच्यामध्ये आम्हाला ह्या ह्या लोकांच्या गाड्या कमी करायच्या आहेत आणि ह्याच्याने महानगरपालिकेला एवढा फायदा होणार आहे. आणि आम्ही तुम्हांला प्रेशन करतो की, तुम्ही जर ह्यांच्या गाड्या बंद केल्या आणि ह्या गाड्या महानगरपालिकेच्या प्रशासनाला दिल्या तर तुम्हाला ते रितसर कॉन्ट्रॅक्टरला पैसे द्यायला लागतील. त्यांचा किती खर्च होणार आहे? तुम्ही ह्याचा ताळमेळ काढला का? आज कोणीही उठून कम्प्लेन्ट करेल आणि तुम्ही गाड्या बंद कराना पण तुम्ही पण स्टे कराना. साहेब, आम्ही इथे बोबलतो. मग तुम्ही रितसर ठराव आणाना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

साहेब, ह्याच्यामध्ये मुदत संपल्यानंतर ठराव आणला जाईल. असे मागच्या समितीत त्यांनी सांगितले होते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आता ही मुदत संपली होती का? आम्ही तुम्हाला मुदत दिली होती का? आता हे लाईफ लॉंग केले. मग, तुम्ही ठराव का आणला? महापालिकेचा लॉस होउ नये म्हणून तुम्ही ठराव आणला ना. मग, त्यामुळे महापालिकेचा लॉस होतो ना. आज मिरा भाईंदरमध्ये काशिमिरा रोड, जेवढे इन्टर रोड आहे तेवढे बी.एस.टी.

चे बस आहेत. बी.एस.टी. तेवढी इन्कम कमावते. आपण तेवढी इन्कम कमवत नाही. आपण फक्त वर्षाला हजार रु. बस स्टॉपला देतो. त्याच बस स्टॉपचे ते लोक ५००० रु. कमावतात. मग, महापालिकेला लॉस नाही. ११ वर्षाचे त्यांना ॲग्रीमेन्ट बनवून दिलेले आहे. आम्ही त्यांना सांगितलेले आहे. अजून त्यांनी ठराव आणलेला नाही. मग हा महापालिकेचा लॉस नाही. साहेब, असे किती तरी विषय आहेत की ज्यांनी महापालिकेचा लॉस होतो. मग, तुम्ही ते विषय का आणत नाही?

**प्रशांत पालांडे :-**

इतर महापालिका काय करतात? तेच सगळं अनुग्रह करायला वेळ जातो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

माझा स्पष्ट आरोप आहे की, तुम्ही फक्त पार्सिलीटी करतात आणि तुम्ही फक्त ठराविक नगरसेवकांची कंम्प्लेंट घेतात. बाकीच्या नगरसेवकांची कंम्प्लेंट घेत नाही.

**एस. ए. खान :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर साहेबांनी सांगितले की, परिपत्रकामध्ये काय लिहलेले होते की, जे साईडवर जातील, बाहेर फिरतील ते करतील. असे ह्याच्यामध्ये उल्लेख आहे. आता तेव्हा ठराव पास झाला. तेव्हा असे होते की, हे लोक बाहेर जाणारे आहे, वसुलीला जाणार आहे. अमुख काम करणार, तमुख काम करणार, मग वाहन दिल्यानंतर असे ऐकू आले की ते बाहेर जात नाही, काही नाही. काही-काही लोकांनी लोन घेतलेले आहे. ते लोन भरतात म्हणून .....

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, सेसच्या कामासाठी किती अधिकारी आहेत?

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की, तुमच्या नियमानुसार कुठल्या अधिका-याला गाडी देता येते? आणि कुठल्या अधिका-याला गाडी देता येत नाही. हे स्पष्ट करा.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, ती सिमा मिश्रा मॅडम, जागेवरुन हलत नाही. तर त्यांना कशाला गाडी पाहिजे. त्या बाहेर कुठे जातात का?

**शरद पाटील :-**

नियम काय सांगतो ते तुम्ही सांगा ना. तुम्ही नियमानुसार सांगा.

**एस. ए. खान :-**

इन्टर प्रिटीशन कोणाला समजत नाही. तर स्थायी समिती काय करणार आहे.

**प्रशांत पालांडे :-**

सन्मा. सदस्य खान साहेब, आपले बरेचसे अधिकारी सेससाठी आहे. त्यामुळे गाड्या लागत नाही.

**एस. ए. खान :-**

परिपत्रक काय म्हणते? परिपत्रकामध्ये काय आहे?

**अजित पाटील :-**

शासकीय कामासाठी ज्यांना बाहेर जावे लागते त्यांना द्यायला पाहिजे.

**शरद पाटील :-**

मग, असे सांगा ना. शासकीय कामासाठी किती व कुठचे अधिकारी आहेत?

**अजित पाटील :-**

वर्ग-१ नाही. वर्ग-२ बद्दलचे वर्ग-१ हे पद वैयक्तिक पद असल्या कारणाने .....

**प्रशांत पालांडे :-**

म्हणजे वर्ग-१ सगळे येणार.

**अजित पाटील :-**

जसे, सचिव पद, लेखा परिक्षण.....

**मिलन म्हात्रे :-**

वर्ग-१ मध्ये सुध्दा बायफरकेशन आहे. असे तुम्ही उगीच उलट-सुलट काही तरी करता मग सभागृहामध्ये वाद होतात. तुमच्याकडे इन्कमचे स्त्रोत व्यवस्थित आहे का? नाही. बजेटची मिटींग झाली. तुमचे.....

**शरद पाटील :-**

तुम्ही स्थायी समितीने फार काही डिसीजन घेतले? कुठच्या लोकांनी त्याच्यावर अंमलबजावणी केली ते सांगा ना.

**अजित पाटील :-**

स्थायी समितीने मागे जो निर्णय घेतला, भत्ता देण्याचा. त्याबद्दल फेरविचार करण्यासाठी आम्ही प्रस्ताव ठेवलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हा फेरविचारच चाललेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

अजित पाटील साहेब, हा फेरविचार चाललेला आहेना. कशामुळे फेरविचार तुम्ही आणला? का? रिजन काय?

**अजित पाटील :-**

आम्ही तुमच्याकडे ठेवतो आणि रिजन हे की, ह्याच्यामध्ये नगरपालिकेचे आर्थिक नुकसान होते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

बरोबर ना. आम्ही असे किती तरी पॉईन्ट्स प्रशासनाला देतो तो विषय का नाही आला? साहेब, तुम्ही हा विषय पास करा. आम्ही महापालिकेचे आर्थिक नुकसान होउ देणार नाही. पण आम्ही असे बरेचसे विषय दिले, ते का येत नाही?

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील साहेबांना सांगुन ते विषय पुढच्या मिटींगमध्ये घ्यायला सांगतो.

**मिलन म्हात्रे :-**

मी मागेच बोललो होतो की, तहकुब विषयाकरीता एक मिटींग लावा. जेवढे काय विषय असतील ते घेवू.

**मा. सभापती :-**

त्यांचे पेमेन्ट झाले हे मला माहित नव्हते. हे मला आता माहित पडले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सभापती साहेब, आज हा डिसीजन तुम्ही घेतला. उद्या दुसरे सभापती आले आणि त्यांनी हा डिसीजन चेंज केला. तेव्हा साहेब, तुम्ही काय बोलणार, तुम्हांला वाईट वाटणार का नाही. साहेब, आम्ही हा डिसीजन घेतलेला आहे आणि आयुक्त साहेबांनी चार महिने झाले पैसे दिले नाही. का दिले नाही?

**मा. सभापती :-**

पहिली गोष्ट वेगळी होती. कारण तेव्हा ऑक्ट्रॉय मधून पैसे येत होते.

**मिलन म्हात्रे :-**

त्यात वाईट वाटायचे कारण काय? साहेब, आपण ठराव केले. आजच्या रिफ्लेक्शनमध्ये दुस-या सभागृहातल्या लोकांनी बोलायचे नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आज प्रशासनाने पैसे का थांबवले? आम्ही पण तुम्हांला ......

**मिलन म्हात्रे :-**

ते चूकीचे आहे म्हणून थांबवले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्ही तुम्हांला पण सांगितले होते की, महापालिका ह्याच्यातून भरपूर फायदा उचलते. आम्ही आजही मिटींगमध्ये बोललो. आजपर्यंत अधिका-यांनी काय केले? आज पानपट्टे साहेबांवर तुम्ही काय ॲक्शन घेतली? मी बोंबलतो. आपल्या महापालिकेला लॉस होतो. मी सांगतो, बी.एस.टी. चे जेवढे खांबे आहेत त्याच्यामध्ये आपल्याला कमी उत्पन्न मिळते. त्यांनी ११ वर्षाचे लिहीले आहे. असे कुठले कॉन्ट्रॅक्ट आहे जे ११ वर्षासाठी लिहलेले आहे.

**मा. सभापती :-**

कमिशनर साहेबांना जावून भेटून या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, सांगितले. पण, अजूनपर्यंत काही त्याचावर ॲक्शन झाली नाही.

**मा. सभापती :-**

आता विषयपटलावर विषय आला ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

फेर विचारासाठी विषय आला ना. मी मान्य करतो.

**नयना म्हात्रे :-**

वसंत राणे कुठे-कुठे फिरतात ते मला सांगा. आपल्या महापालिकेतले १० हजार रु. त्यांना पण द्यायचे.

**प्रशांत पालांडे :-**

ठेक्याच्या गाडीला किती खर्च आहे ते सांगा?

**अजित पाटील :-**

नगरपालिकेत एकंदर ठेक्याच्या ८ गाड्या आहेत. प्रभाग अधिकारी करीता टाटा सुमो आहे. क्षेत्रिय अधिका-याकरीता दोन टाटा सुमो आहेत. विद्युत विभागाकरीता १ टाटा सुमो आहे. वाहन विभागाकरीता १

टाटा सुमो आहे. विधी अधिकारी इंडिका गाडी, जाहिरात विभाग १ टाटा सुमो, वैद्यकिय अधिकारी १ टाटा सुमो आणि त्याचा रेट असा आहे की, टाटा सुमो, अरमडा नॉन ए.सी. २१,२०५ रु. महिन्याचा रेट आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

एकूण खर्च सांगा ना किती आहे?

**अजित पाटील :-**

मासिक खर्च १ लाख ६९ हजार रु. होतो.

**प्रशांत पालांडे :-**

किती गाड्यांवर?

**अजित पाटील :-**

१० गाड्यांवर होतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

३१ लाख रु. तुम्ही ह्याच्यासाठी म्हणतात ना. तुम्ही कॅल्क्युलेशन करा ना. २१ x ८ करा ना. मग गुणीले १२ करा. म्हणजे ८ लाख रु. झाले ना. आज हे ३ लाख रु. किती कर्मचारी आहेत? ३१ कर्मचा-यांचे ३ लाख रु. आणि ८ गाड्यांचे १ लाख रु. मा. सभापती साहेब, तुम्ही बघा ना. ८ गाड्यांचे कुठे आणि ३१ गाड्यांचे कुठे?

**मिलन म्हात्रे :-**

आता प्रभाग अधिका-याचे सांगितले. एका प्रभाग अधिका-याला एक गाडी दिली की, चार प्रभाग अधिका-यांना चार गाड्यांचा हिशोब दिला आहे.

**अजित पाटील :-**

टेम्पो भाड्याने दिले त्यांची माहिती दिली.

**मिलन म्हात्रे :-**

प्रभाग अधिकारी कोण ते मला सांगा. त्या प्रभाग अधिका-याचे नाव काय?

**अजित पाटील :-**

श्री. सुनिल यादव यांना गाडी दिली.

**नयना म्हात्रे :-**

श्री. सुनिल यादव यांना कुठली गाडी दिली?

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही मला हे सांगा की, सुनिल यादव हे आजच्या तारखेला प्रभाग अधिकारी आहे का?

**अजित पाटील :-**

हो, आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

मग, त्यांना भाड्याची गाडी पण दिले आणि मागच्या ठरावामध्ये पण त्यांचे नाव आहे. १० हजार रु. चे.

**नयना म्हात्रे :-**

ही गोष्ट पण बरोबर आहे.

**अजित पाटील :-**

आता ऑडीटरला गाडी दिली.

**मिलन म्हात्रे :-**

प्रश्न तो नाही. तुमचे एक्स्पेन्स आहे, तुमचे चलन बनते ना. तर त्यांचे इथे नाव आहे. २३ नंबरला सुनिल यादव यांचे १० हजार रु. साठी नाव आहे.

**अजित पाटील :-**

ते आता ऑडीटरला दिले.

**मिलन म्हात्रे :-**

मी काय सांगतो ते ऐका. तुमच्या रेकॉर्डनुसार सांगतो. त्यांनी तुम्ही भाड्याची गाडी पण दिली आणि वाहन भत्ता पण दिला. इथे कागद दाखवतात.

**बाबुराव वाघ :-**

पहिले प्रभाग अधिकारी हे श्री. हेमंत पाटील होते. तेव्हा त्यांना गाडी दिली होती.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही आता काय-काय केले त्याच्याशी काही देणे-घेणे नाही. तुमच्या बोलण्यावर आमचा पाच पैशाचा विश्वास नाही. सो कॉपी एक लेखी कागद दाखवा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

श्री. सुनिल यादव हे वसुलीत होते. आता ते नुकतेच प्रभाग अधिकारी झाले.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी चार्ज कधी घेतला?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

साधारणतः दिड महिना झाला असेल.

**मिलन म्हात्रे :-**

दिड महिना झाला. आता मला सांगा ह्याच्यामध्ये १० हजार रु. द्यायचे म्हणून सुनिल यादव यांचे नाव आहे. आता तुम्ही दाखवता देय रक्कम.

**अजित पाटील :-**

त्यांना दोन ठिकाणी .....

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

वाहन डबल दिले नाही.

**मिलन म्हात्रे :-**

असे तुम्ही बोलता. लागेल तेच बोलतात ना.

**प्रशांत पालांडे :-**

हे बदलून द्या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

१० हजार रु. मध्ये ते आहे ना.

**प्रशांत पालांडे :-**

त्यांना ती गाडी पण दाखवतात ना.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही नाही बोलून चालत नाही. मागे परिवहन समिती सभापती इलेक्शन झाली नव्हती. परिवहन अधिक्षक जवळ जवळ ३० लाख रु. च्या गाड्या घेतल्या. बेलोरो गाडी साडे आठ लाख रु. ची एक गाडी घेतली ना. पद नाही, अधिकारी नाही. मनाळे साहेबांनी टिपणी तयार केली फटाफट ब्रॅन्ड न्यु गाडया आल्या. त्या घेतल्या कोणाला आणि दिल्या कोणाला? त्या वाहनच्या केसमध्ये हे सगळं डिस्कशन झालेले आहे. आता म्हणून ती तुम्हाला बंदी आलेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही वाहन विभागाचे इन्चार्ज आहात.

**प्रशांत पालांडे :-**

अतिक्रमण विभागाचे इन्चार्ज आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, मला वाटत नाही की, तुम्ही जो खर्च सांगितला तो बरोबर आहे.

**अजित पाटील :-**

खर्च किती होतो ते माहित आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, एका गाडीला एकूण खर्च किती येतो?

**दादासाहेब पाटील :-**

एका गाडीला ५६ हजार रुपये खर्च येतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ऑडीटर साहेब, एका गाडीला किती खर्च येतो? माझ्या माहितीप्रमाणे गाडीला जास्त खर्च आहे.

**अजित पाटील :-**

२१ हजार २०५ रु. .....

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ऑडीटर साहेब, तुम्ही सांगा खर्च किती येतो?

**दादासाहेब पाटील :-**

ह्यांनी जो खर्च सांगितला तो बरोबर आहे. पण, आपल्या गाडीला जास्त खर्च येतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपल्या गाडीला किती खर्च येतो?

**दादासाहेब पाटील :-**

३० हजार रु. खर्च येतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपली गाडी म्हणजे महापालिकेची गाडी. त्याचे ३० हजार रु. कसा काय खर्च येतो? साहेब बघा. म्हणजे महापालिकेच्या गाडीला ३० हजार रु. प्रायव्हेट गाडीला २१ हजार आणि आपण फक्त १० हजार रु. देतो. जर तुम्ही कल्क्युलेशन केले ना, तर आपण .....

**मा. सभापती :-**

२१ हजार देतो. त्याच्यात पेट्रोल, डिझेल सर्व आले.

**प्रशांत पालांडे :-**

१० हजार रु. मध्ये पण सगळं येते. आपल्याला कुठे काय द्यायला लागते.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजे ह्याचा अर्थ उद्या तुम्ही तीनला पण द्याल.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

पाटील साहेब, विषय साधा आहे. स्थायी समितीने जो निर्णय घेतलेला आहे. सरसकट वर्ग-२ अधिकाऱ्यांना १० हजार रु. दिलेले आहे. ह्याच्यात काही कटींग करता येतो का? हा विषय आहे. सर्वांचे बंद करावे. स्थायी समितीचे निर्णय न मानावे अशी चर्चा नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही प्रपोजल द्या. प्रशासनाला प्रपोजल द्या की, एवढ्या गाड्या बंद करायच्या आहेत आणि एवढे पैसे आपले वाचतील. आम्ही तुम्हाला सांगतो की, पैसे कसे वाचत नाही. कारण की, तुम्हाला ह्या लोकांना द्यायला लागतील. तर २०, २१ हजार रु. एक्स्ट्रा खर्च लागतील. मग, ते तुम्ही कल्क्युलेशन करा. कारण उद्या सचिव साहेब बोलले, मला हायकोर्टामध्ये जायचे आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

तुम्ही सचिवांचे नाव कशाला घेता? मी तुम्हाला खुलासा केला ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मी फक्त एक एक्झाम्पल दिले.

**मिलन म्हात्रे :-**

जे अधिकारी बाहेर सर्व्हे करायला जात नाही आणि त्यांना आपण गाडी देतो. त्यांच्याबद्दल बोला ना.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, गोविंद परब साहेब कुठे फिरतात? ते मला सांगा.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, ह्याच्यात कोणाला देवू शकतात आणि कोणाला नाही? ह्याचा तुम्ही निर्णय घ्या.

**नयना म्हात्रे :-**

आम्हाला त्यांची नावे सांगा. कोणाला १० हजार रु. देणार कोणाला नाही. त्यांची नावे सांगा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, एक एक्झाम्पल देतो. आता फक्त सहा गाड्या कमी झाल्या. समजा १० लोकांमध्ये ५ लोकांना समजा पुढे जायचे आहे आणि आपण त्यांना अरेन्ज करुन दिले.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

दोन गाड्या ॲडिशनल महापालिकेत ठेवायला लागणार आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हे बघा. माणसं आहेत दहा आणि तुम्ही फक्त दोनच गाड्या ठेवल्या. त्याच्यामध्ये परत असे झाले की, मला गाडी पाहिजे, मला गाडी पाहिजे ह्या दोन गाडीला खर्च येईल ४२-४३ हजार रु. म्हणजे ४१-४३ हजार रु. मध्ये आपण .....

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

एखादी गाडी तर ठेवावी लागेल ना.

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्या ज्या गाड्या आहेत. एखादा अधिकारी आला तर त्या भाड्यांच्या गाड्यांमध्ये कुठे फिरतात? एखाद्या अधिकाऱ्याला दिली. समजा, आता मी एक अधिकारी आहे. मी तिकडे ऑफिसला आलो, ती गाडी पटापट उभी राहते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पाटील साहेब, मी तुम्हाला असा प्रश्न विचारतो की, उद्या आपण ह्यांच्याकडून गाड्या काढल्या. १०-१२ अधिकाऱ्यांना आपण गाड्या दिल्या नाही आणि त्यांच्यासाठी आपण दोन गाड्या ठेवल्या. तर, तुम्हाला असे वाटते की, हे १०-१२ अधिकारी २ गाड्यांमध्ये मॅनेज करु शकतात. वाघ साहेब, तुम्ही सांगा की हे पॉसिबल आहे का? पॉसिबल असेल तर बोला, नसेल तर नाही बोला. साहेब, हे अतिशय बरोबर आहे. महापालिकेचे पैसे वाचेल पाहिजे. परंतु, ह्या प्रॉब्लेमकडे बघा ना. म्हणजे आपण पैसे वाचवले आणि इथे भाड्यांच्या गाड्यांची लाईन लागली.

**मा. सभापती :-**

भाड्याची गाडी घ्यायची नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मा. खतगावकर साहेब, भविष्यातली तुमची आर्थिक बाजू बघता, तुम्हाला सगळं आमचे हळूहळू कपात करायला लागणार आहे.

**मा. सभापती :-**

आपल्याला गाड्यांची जरुरत नाही. त्यांचे ते बघतील. भाड्याने घ्यायची जरुरत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

वरिष्ठांची तरतुद बघा ना आणि आता ह्याच्यावर एक जी.आर. लागलेला आहे. तुमचे ह्याच्यावर लक्ष नाही. जरी सचिवांना गाडी अलाउड केली. तरी सचिवांनी १२५ लीटरचे प्रति माह बंधन आहे. ह्याच्यावर पर लीटर बंधनसुध्दा आहे. ते तुम्ही चेक केले का? आता आपण पैसे देतो एखाद्या माणसाला तुम्ही साडे तेरा हजार रु. दिले. पण मी साडे तेरा हजार रु. घेवून किती किलोमीटर गाडी चालवली आता निवडणूक आयुक्त हे आपल्या आख्ख्या महाराष्ट्रात गाडी फिरवली. एक एका ॲम्बॅसेडरचे तुमचे उत्तन ते भाईंदर पर्यंतचे एका दिवसाचे किलोमीटर आहे. ५५० एक गाडी ५५० कि.मी. चालली. माहितीच्या आधिकारात माझ्याकडे कागद मिळाले. ह्याच्यावर कोणाचा कंन्ट्रोल आहे का? आता गाडी घेतली तर ३० लाख रु. का खर्च होणार नाही. एक ॲम्बॅसेडर गाडी भाईंदर ते उत्तन किती फेऱ्या मारेल? प्रशासकीय कामकाज सकाळी १० ते ५ सारखीच गाडी चालू ठेवली तरी ५५० रु. कि. मी. होणार का?

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, ती गाडी महापालिकेची होती की, आपण महापालिकेने भाड्याने गाडी घेतली होती?

**मिलन म्हात्रे :-**

महापालिकेची स्वतःची ॲम्बेसेडर गाडी आहे. एक गाडी त्या निवडणूक आयोगाने उल्हासनगरच्या इलेक्शनच्या कामासाठी गाडी नेली होती. ती गाडी ७-८ महिने वापरली गेली. सगळी हिलस्टेशन पार केली गेली. ज्यावेळी कलेक्टर साहेब हे डी.एम.सी. होते. मग, गाडी मागवून घेतली होती तेव्हा तो अधिकारी माझ्याशी भांडू लागला. निवडणूकीचा अधिकारी गायकवाड त्यांचे आडनाव आहे. तुमची आमची गाडी काढून घेतली तर आम्ही तुमचा भत्ता घेतला का? तुम्ही काय म्हंटल असत की, उल्हासनगरचे इलेक्शन संपले की, दुसऱ्या दिवशी आमच्याकडे गाडी पाहिजे. तसे परिपत्रकात लिहलेले असते. नसेल कलेक्टर आपली गाडी ताब्यात घेतो तसे देतो असे बंधन आहे. उटसूट मिरा भाईंदर महानगरपालिका दोन गाड्या कलेक्टरने खाल्ल्या. पाच-पाच साडे चार लाख रु. च्या गाड्या तुम्हाला दिसल्या पण नाही. नगराध्यक्ष बसला पण नाही. हे आपले पद आहे. ९ लाख रु. किंमत आहे. आज त्यांना कोण बोलले का? माहितीच्या आधिकारात जी माहिती आली ती फार विचित्र आहे. ड्रायव्हर लोकांचा, मजूर, गॅरेज यांचे आपण पैसे बघितले का? आमची जी केस आहे त्याच्यामध्ये जी.आर. आहे. तो वाचून दाखवा. त्याला तुम्हाला बंधन आलेली आहेत. ही बंधने कशासाठी आलेली आहेत? एक ॲम्बॅसेडर गाडीची किंमत पाच लाख रु. आणि त्याच्या वर्षाचा खर्च किती? साडे तीन लाख रुपये. मंत्रालयामध्ये ३०-३० वर्षे गाड्या खोकल्या झालेल्या आहेत. २००२ नंतर घेतलेल्या गाड्या ५ वर्षात, ६ वर्षात ॲम्बॅसेडर गाडीचा पूर्ण सत्यानाश झाले आणि एकही स्टॉक रजिस्टर नाही. गोडावूनमध्ये मेन्टेनन्स बघा. बॅटरी बदलली तर तुमची जुनी बॅटरी आली पाहिजे. त्याचे आतापर्यंत ऑकशेन झाले का? एक ही गोडावूनचे ऑकशेन झालेले नाही. टायर बदलला, तुमचा दुसरा घसलेला टायर ठेवलाय गोडावूनला माहितीच्या अधिकारात माहिती मागवून त्याच्यामध्ये रजिस्टरच ठेवलेले नसणार तर तुम्हाला काय माहिती पडणार.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, तुम्ही कोणाकोणाला पैसे देणार ते पहिले आम्हांला सांगा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आता समजा आम्ही हा ठराव केला आणि समजा एखादा अधिकारी चुकून राहून गेला. मग, तुम्ही काय करणार? किंवा हा विषय परत आणणार. आता ही जी लिस्ट आहे. ह्याच्यामध्ये काही अधिकारी नाही.

**मा. सभापती :-**

आता आपण ठराव वाचताना नाव घोषीत करु.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ह्याच्यामध्ये ॲनकरेजमेन्ट डिपार्टमेन्टचा उल्लेख केलेला नाही. किरण राठोडचा उल्लेख केलेला नाही. मग, ह्यांचे कमी करायचे का?

**अजित पाटील :-**

ह्यांना साईडला जावे लागते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

जावे लागते ना. पण ह्याच्यामध्ये नाही. मग, तुम्ही कशाला मुख घेवून बसते.

**मिलन म्हात्रे :-**

मिरारोडला ७ माळ्याचे टॉवर बांधले. तेव्हा किरण राठोड काय करत होते. तो टॉवर पाडला ना. मी ७ प्रकरणामध्ये पत्र लिहलेले आहे. ह्या अधिकाऱ्यांना आपण चांगले काम करण्याकरिता देतो. त्यांनी गाड्यांचा भत्ता घेतला का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ते इललिगल बिल्डींग आहे.

**मिलन म्हात्रे :-**

असे चालत नाही. तुम्हाला कोर्टामध्ये द्यायचे आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी ॲफिडेव्हीट बनवून दिले. महापालिकेने जर आम्हाला माहिती दिली असती तर जिम्मेदारी कोर्ट कन्टेम्प्टमध्ये कमिशनर जाणार आहे. धिंडे साहेबांनी लिहून दिलेले आहे. आता मला किरण राठोडने याचे उत्तर द्यावे ह्या अगोदर तुम्हाला गाडीची व्यवस्था होती. मग, तिकडे कसा काय टॉवर झाला. ७ माळ्याचा टॉवर पूर्ण होतो आणि पाडले जातात. पेपरला ॲडव्हरटाईज केले जातात, फोटो दाखवले जातात. घेवारे साहेबांचा त्याच्या बरोबर फोटो ७ माळ्याची टॉवर झाली कशी काय? तुम्ही मंजूरी कशी दिली? रिझर्व्हेशनमध्ये होईपर्यंत तुम्ही काय करत होते. रिझर्व्हेशनमध्ये तुम्हाला प्लिंथ झाली, स्लॅप पडले. नशिब चांगले की, ती बिल्डींग सेल नाही झाली.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, तुम्ही ज्यांना पैसे देणार त्यांची नावे डिक्लर करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुमचे म्हणणे अगदी बरोबर आहे. पण, साहेबांना पण साहेबांना उत्तर देवू द्या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

हे पहा, ह्याच्यामध्ये एखाद्याचे नाव वगळले असेल आणि उद्या त्यांना फुल ड्युटी दिली असेल, तर त्यांना वाहन द्यायला लागेल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ते कसे काय?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

"ए" कॅटेगरीचे अधिकारी असतील, त्यावेळेस प्रभाग अधिकारी म्हणून जो कोणी असेल आणि त्याचे वाहन असेल तर त्याचे कमी होईल ना.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, मला हे सांगा. आता तुम्ही आपतकालीनला सुध्दा वाहने दिली ना.

**प्रशांत पालांडे :-**

खतगावकर साहेब, आपल्याकडे सेसला किती अधिकाऱ्यांना ड्युटी लावलेली आहे?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

सेसला एकूण २० अधिकारी आहेत.

**प्रशांत पालांडे :-**

सगळे २० अधिकारी आले का? आपण २० जणांना वाहने देतो का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

त्याच्यावर अजून निर्णय झालेला नाही.

**प्रशांत पालांडे :-**

तो निर्णय कधी होणार? आताच निर्णय करायला पाहिजे ना.

**मिलन म्हात्रे :-**

२० पैकी १४ अधिकारी ह्याच्यामध्ये आहे आणि एक अधिकारी एक काय चार वाहन येथून जाईल फरक काय पडतो ती गाडी काय टू व्हिलर नाही.

**नयना म्हात्रे :-**

कोणाच्याही प्रभागामध्ये अधिकारी गेले ना. तर, त्याच्यामध्ये बांधकामवाला पण बसतो आणि आरोग्यवाला पण बसतो.

**मिलन म्हात्रे :-**

नवी मुंबईमध्ये तर औषध मारण्यासाठी मिनी बस ठेवलेली आहे आणि एक एक अधिकारी इकडून ठाण्याला गाडी नेतो. शनिवारी ती गाडी ठाण्याला असते. तो गाडी ३५ कि.मी. नेणार, परत आणणार, परत जाणार, परत येणार, १८० कि.मी. गाडी चालते.

**प्रशांत पालांडे :-**

लॉग बुक असते ना.

**मिलन म्हात्रे :-**

लॉग बुक काय जाळायचे. लॉग बुकनुसार खर्च मंजुर करुन देतो ना. खर्चाच्या मंजूरीला कुठेतरी आणाल ना.

**मा. सभापती :-**

हा विषय पुढे ढकलायचा का?

**मिलन म्हात्रे :-**

नाही हा ठराव घ्यायला पाहिजे.

**प्रशांत पालांडे :-**

सेसला अधिकाऱ्यांना ड्युटी लावली त्यांचे काय करायचे?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

मा. आयुक्त साहेबांनी त्याबाबत अजून धोरण निश्चित केले नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, मला तुम्ही सांगा की, पहिला शासन निर्णय दिला. त्या शासन निर्णयानुसार आम्ही ठराव मांडला. ठराव मांडल्यानंतर तोच गोषवारा परत येतो. याच गोषवाऱ्यामध्ये असे कुठेही लिहलेले नाही की, तुमच्याकडून ह्या अधिकाऱ्याने गाड्या दिल्या पाहिजे आणि ह्या अधिकाऱ्याने गाड्या दिल्या नाही पाहिजे. त्याच्याने आपला फायदा होणार आहे. त्याच्यानंतर आपण बाहेरच्या गाड्या लावायच्या आहेत आणि भाड्याच्या गाड्याने एवढाच खर्च होणार आहे. आणि आपल्या महापालिकेला एवढा फायदा होणार आहे. तुम्ही असे कुठे दिले? तुमचे कॅल्क्युलेशन काढा ना.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

पाटील, साहेब, ह्याच्यामध्ये दोन तीन प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्या. पेपरमध्ये बातम्यासुध्दा आल्या होत्या आणि ज्या अधिकाऱ्याला अनुज्ञेय वाहन भत्ता नाही. अशा लोकांना वाहन भत्ता दिला अशी स्थायी समितीची तक्रार होती. यावर मा. आयुक्त साहेबांनी विभागाशी चर्चा करुन हा निर्णय फेर सादर मा. स्थायी समिती समोर आणलेला आहे. ह्याच्यामध्ये जो सरसकट निर्णय झालेला आहे. त्या ऐवजी अनुज्ञेय पदाला वाहन भत्ता अनुज्ञेय करावा. हे पद अनुज्ञेय होत नाही, त्याला करु नये. एवढ्या फेर विचारासाठी हा विषय आलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, चार महिने ह्यांचे पैसे थांबले का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

हा निर्णय झाल्यानंतर त्याच्यावर आम्ही निर्णय घेवू.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

उद्या हा निर्णय नेगेटिव्ह झाला.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

आजच्या तारखेपर्यंत ज्यांनी काम केले त्यांना ते पैसे अनुज्ञेय आहे. तो ठराव रद्द झालेला नाही. ते पैसे दिले जातील.

**शानु गोहिल :-**

साहेब, आपल्याकडे सध्या किती गाड्या चालू आहेत आणि किती गाड्या बंद आहे?

**मिलन म्हात्रे :-**

साहेब मला एक सांगा की, तुमचा अगोदरचा ठराव चुकीचा झाला असेल. जी व्यक्ती महापालिकेमध्ये ३० दिवस-२८ दिवस जितके दिवस असतील तितके. ती व्यक्ती आपल्या कार्यालयात बसून आहे. आणि त्याला पण तुम्ही दहा हजार रु. मंजूर केले तर ते तुम्ही कसे काय पेड करणार?

**मा. सभापती :-**

आज ठराव झाला तो बरोबर आहे ना.

**मिलन म्हात्रे :-**

असे नाही. त्यांचा प्रश्न काय आणि ते उत्तर काय देतात ते बघा जरा तुम्ही सभापती आहात नीट व्यवस्थित त्यांना विचारा. आणि मा. आयुक्त साहेबांनी जे पेमेंट थांबले त्याला कारण तेच आहे.

**मा. सभापती :-**

आज पासून जी जुनी रुलिंग आहे ती चालू आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेबांनी जे पेमेंट थांबवले ना त्याला कारण तेच आहे. त्या माणसाच्या अधिकाऱ्याचा पत्ता भाईंदरच्या महानगरपालिकेच्या समोर आहे. तो अधिकारी पायी चालत येतो खुर्ची वर बसतो. ए.सी.च्या केबिनमध्ये बाहेर कधी पडत नाही. मग, त्याला कमिशनर साहेब दहा हजार रु. देणार का? वाहनच चालवत नाही तर तो पैसे कसे काय देणार. ह्याच्यामध्ये अशी ही लोक आहेत की त्यांच्याकडे वाहन ही नाही. तुम्ही फक्त वन साईड बोलू नका. तुम्ही सांगा ना. तुमच्या लिस्टमध्ये ज्या अधिकाऱ्यांचे वाहन नाही त्याला पण पैसे

देतात बोला हे चुकीचे आहे मी तुम्हांला सांगतो तुम्ही नाही सांगा मी तुम्हांला नावे देतो. म्हणूनच मा. आयुक्त साहेबांनी त्यांचे पेमेंट थांबवले.

**मा. सभापती :-**

कमिशनर साहेब तसे देणारच नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मी तेच बोलतो. ते काय बोलतात ते बघा. त्यांचे पहिले वक्तव्य काय आहे ते बघा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

ज्यांची गाडी नाही त्यांना कसे काय पैसे देतील.

**मिलन म्हात्रे :-**

एखाद्या सभापतीला पटवले. त्यांनी वाटेल तसे ठराव केले. जी.आर. बघितले नाही. आम्ही पुढे कंटीन्यू द्यायची का? आम्हांला ज्या दिवशी दृष्टीपटल येईल की, या पूर्वीच्या सभापतींनी चुकीचा निर्णय घेतलेला आहे. सगळ्या नगरसेवकांचे काय आहे की, त्यावेळेला जे चुकले. ते रदद करा आणि फ्रेश भुमिका आणा त्याचे फ्रेश ठराव आणा आमच्या ठरावात लिहिलेले आहे की ह्या पूर्वीचे ठराव रद्द करा आणि या ठरावानुसार कारवाई करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब तुम्ही आधी प्रशासनाची यादी बघा या यादीमध्ये जे अधिकारी आहेत ते अधिकारी योग्य आहे की, अयोग्य आहेत आणि आणखीन कुठले अधिकारी राहिले का? हे चेक करा उद्या समजा एखाद्याने जाणून बुजून सांगितले की मला हे पटल नाही आणि मी हे नाव घेतलेच नाही.

**मिलन म्हात्रे :-**

पटायला कशाची गरज आहे. काही पटायची गरज नाही. पटल न पटलं आपली गोष्ट आहे. मा. आयुक्त साहेबांनी त्यांची टिपणी व्यवस्थित दिले. त्याच्यात त्यांनी दिले साईड आणि कार्यालय ते सगळे बहूतेक अधिकारी साईड आणि कार्यालयामध्ये इनव्हालमेंट आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुमच्याकडे एन करेजमेंट डिपार्टमेंट आहे. तुमच्या इंजिनियरला गाडी नाही पाहिजे. ह्याच्यामध्ये किरण राठोडचे नाव नाही.

**अजित पाटील :-**

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील साहेब चूक झाली, राठोड यांची साईड द्यायला राहिलेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

इरकर साहेब आहेत ते पण साईडवर जातात.

**शानू गोहिल :-**

अजित पाटील साहेब मी तुम्हांला प्रश्न विचारला की, आपल्याकडे किती गाड्या बंद आहेत.

**अजित पाटील :-**

आपल्याकडे एकंदर ९ गाड्या बंद आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

अजित पाटील तुम्ही वर्ग २ मध्ये काय नेम अनुज्ञेय होत नसेल तर पदावर करा ना. त्या पदाला जो असेल तो.

**अजित पाटील :-**

साईडवर जाणा-यांनाच गाडी द्यायची असे ठरले होते.

**मिलन म्हात्रे :-**

नावानिशी गाडी नाही देणार.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

नावानिशी बोलले तर सर्वांना द्यायला लागेल.

**मिलन म्हात्रे :-**

पद आहेत. नगरसचिव, उपअभियंता सहाय्यक आयुक्त, प्रशासन अधिकारी, प्रभाग क्षेत्रिय अधिकारी, अधिक्षक मार्केट परवाना, अधिक्षक अन्न अधिक्षक सहा. नगर रचनाकार हे असे दिलेली आहेत पण दिलेली आहेत आता त्यांनी इरकर साहेबांचे नाव घेतले भगतसिंग उद्यानला एक महिना झाला वॉचमेन नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

ह्याच्यामध्ये किती अधिका-यांना अनुज्ञेय करायचे, किती अधिका-यांना गाड्या अनुज्ञेय नाही करायचे.

**प्रशांत पालांडे :-**

सन्मा. पाटील साहेब चुकून काय राहिले बसेल तर आता क्लिअर करा.

**अजित पाटील :-**

किरण राठोडची साईड लिहायची राहिलेली आहे.

**प्रशांत पालांडे :-**

काय राहिले.

**अजित पाटील :-**

कार्यालय आणि साहित्य.

**मिलन म्हात्रे :-**

मुद्दामुनच नाव ठेवलेले नाही. आज महितीच्या अधिकारामध्ये तुम्हांला जर उत्तर दिली तर प्रभाग कार्यालयातून अतिक्रमणमध्ये माहिती येत नाही.

**प्रशांत पालांडे :-**

त्यांनी केले ना. प्रशासनाने...

**मिलन म्हात्रे :-**

प्रशासनाने सगळंच दिले.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

अजित पाटील वर्ग २ पदाला तुम्हांला किती गाड्या पाहिजे.

**प्रशांत पालांडे :-**

वर्ग १ ला सगळ्यांनाच द्यायचे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

वर्ग १ ला तर सगळ्यांनाच द्यावे लागतील. वर्ग २ मध्ये किती पदाला पाहिले. तेवढे स्थायी समितीसमोर घ्या आणि फक्त पदाला मान्य करा.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही लिस्ट दिले ना.

**अजित पाटील :-**

त्यांना जो भत्ता द्यायचा आहे त्याची माहिती टिपणीमध्ये दिलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही प्रतीपूर्तीमध्ये ठरावानुसार भत्ता देतात. त्याच्यात पूर्वीचे आहेत. जे इकडे बसतात त्यांची पण नाव आहे तोच तर वाद आहे.

**मा. सभापती :-**

पाटील साहेब, पुढच्या गुरुवारी वर्ग -१, वर्ग-२ ला कोणाला भत्ता द्यायचा. ह्या विचारासाठी पुढच्या वेळेला ठराव घेवून या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

बरोबर आहे. पुढच्या वेळेला हा विषय व्यवस्थित आणा.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६१, श्री. मनोज सिन्हा (सर्वेअर) यांना मासिक ठोक मानधनात वाढ करणेबाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत विविध विकास कामे पार पाडण्यात येत असून त्यात महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते, गटारे, इतर बांधकामे करण्यासाठी प्रत्यक्ष जागेवर जावून लाईन आउट देणे, लेव्हल घेणे, डि.पी. नुसार आणखी करणे इत्यादी कामाकरीता त्यावेळी कामाचा वाढलेला व्याप पाहता कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी केलेल्या मागणीनुसार तांत्रीक कर्मचारी अपूर्ण असल्याने जाहिर वृत्तपत्रात जाहिरात देवून जाहिरातीचे अनुषंगाने श्री. मनोजकुमार सिन्हा यांनी दि. ११/११/२००२ रोजी महानगरपालिकेजवळ अर्ज सादर केला होता. त्या अर्जाच्या अनुषंगाने मा. स्थायी समिती सभा दि. २८/११/२००२ ठराव क्र. ४५ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार प्रथम त्यांना दि. ०२/१२/२००२ पासून ठोक रु. ७५००/- या मासीक मानधनावर नियुक्ती करण्यांत येवून त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाचे आवश्यकता असल्याचे मागणीनुसार मा. स्थायी समितीच्या मान्यतेने वेळोवेळी मुदतवाढ देण्यांत आलेली होती. दरम्यान त्यांनी महानगरपालिकेत कायम होण्यासाठी दि. २०/०३/२००५ रोजी मा. औद्योगिक न्यायालय ठाणे येथे १३८/०२००५ दावा दाखल करुन प्रकरण न्यायप्रविष्ठ केले. सद्यस्थितीत प्रकरणात स्थगित आदेश असल्याने त्यांना पूर्वीच्या ठोक दराने मानधन देण्यात येते. परंतु त्यांनी दि. ०४/०८/२००८ रोजी विनंती अर्ज सादर करुन महागाई वाढलेली असून आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे मासीक मानधन रु. १२,०००/- पर्यंत वाढवून मिळणेसाठी विनंती केली आहे.

श्री. मनोजकुमार सिन्हा, सर्वेअर हे दि. ०२/१२/२००२ पासून ठोक मानधन रु. ७५००/- वर आजपर्यंत कार्यरत असून यांनी मानधन वाढवून मिळणेबाबत केलेल्या अर्जावर कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी रु. १२,०००/- मासीक मानधन वाढवून देण्यास शिफारस केलेली आहे. त्या अहवालास मा. आयुक्त सो., यांची मान्यता असून प्रकरणात वस्तुस्थिती पाहता महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सर्वेअर हे पद रिक्त नाही. परंतु, प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने त्यांनी वाढीव मानधनाची केलेली मागणी विचारात घेता मंजुर 'सर्वेअर' या पदाची वेतनश्रेणी रु. ४०००-१००-६००० अशी असून सर्वेअर या पदाच्या किमान रु.

४०००/- या वेतन दराप्रमाणे स्थायी पदाचे सर्व वेतन व भत्ते एकत्रीत करता श्री. मनोजकुमार सिन्हा (सर्वेअर) यांना रु. १०,०००/- ठोक मासीक मानधन २६ दिवसांकरीता प्रदान करणेस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

बारकुंड साहेब मला एक सांगा आता ही जी स्थगिती दिले. त्याबद्दल आपलं काय मत आहे?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलते. ह्याच्यामध्ये कंम्प्लेन्टमध्ये पेज वाजून दाखवते. त्या संदर्भामध्ये कोर्टाने स्टॅटॉस्को ऑर्डर दिलेली आहे. डायरेक्ट दी रिसपॉन्डीग टू इश्यू लेटर ऑफ परमनन्ट सी टू दी कॉम्प्लिमेंट फ्रॉम द डेट व्हेन कॉम्प्लीमेन्ट हॅस कम्प्लीटेड. २४० डेस कन्टीन्युस सर्व्हिस विथ द रिस्पॉन्डीग डुईंग द प्रोसेडींग १२ कॅलेन्डर मन्थस विथ ऑल द अदर काउन्सील क्वान्टीटी बेनेफीट. ह्याच्यामध्ये ह्यांना पर्मानन्ट करावी अशी प्रेयर आहे आणि त्यांच्या जागी इतर कुठल्याही सर्व्हेअरला हा दावा संपेपर्यंत ठेवू नये. त्या संदर्भास स्टेटस्को कोर्टाने ऑर्डर दिलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पण त्यांचा पगार?

**एस. ए. खान :-**

कॉपी आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

त्यांच्या पगाराचे काय? स्टेटेस्कोचा अर्थ काय आहे? तुम्ही त्यांना कामावर ठेवणार. दुसऱ्याला कोणाला ठवू नये.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

ह्यांना काढून नये आणि दुसरे कोणाला ठेवू नये.

**मिलन म्हात्रे :-**

बरोबर ना, म्हणजे जशी परिस्थिती आहे तशी आहे. अशा परिस्थितीत आपण वाढवू शकतो का?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

साहेब, आपली ही जी प्रेयर आहे, त्या प्रेयरला कुठलीही हे न करता त्याच्यामध्ये पगार .....

**मिलन म्हात्रे :-**

असे कसे? आपली कुठलीही प्रेयरला हे न करता आपण त्यांना कमिशनर पण बनवूया.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

जी प्रेयर आहे. त्या प्रेयरच्या अनुषंगाने स्टेटेस्को ऑर्डर आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मी काय विचारले? त्याचे फक्त मला उत्तर द्या. आम्ही जे वाढवून देणार आहोत, त्या माणसाने एकतर महापालिकेच्या, प्रशासनाच्या विरोधामध्ये जावून स्थगिती घेतली.

**एस. ए. खान :-**

वाचता का? इंटरप्रिटेशन काय करता?

**नयना म्हात्रे :-**

सगळ्यांना त्याची झेरॉक्स काढून द्या.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यानंतर न्यायक्रिया चालू आहे. आता ह्याच्यात बघा. त्या माणसाने आपल्याला अर्ज केलेला आहे. एकदा न्यायप्रविष्ट बाब झाली तर त्यांनी कोर्टाला अर्ज करावा ना. बारकुंड साहेबांनी पण त्याच्यामध्ये डायरेक्शन देणे चूकीचे आहे. त्यांनी कोर्टाकडे जावे आणि बोलावे की, मला ७ हजार रु. परवडत नाही. ७ चे १७ हजार रु. करा. ऑर्डर घेवून यावे. आम्ही १७ काय ३४ हजार रु. देवू. मला एवढे माहिती आहे की, मी जर कोर्टात गेलो, मला काय म्हणायचे आहे. अर्ज करुन त्याच्यावर ऑर्डर घेवून यायची. विषय संपला. हे मी बरोबर बोलतो की, चूकीचे बोलतो.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

त्यांची प्रेयर वेगळी आहे.

**मिलन म्हात्रे :-**

प्रेयर प्रेयर करु नका. मामला कोर्टामध्ये न्यायप्रविष्ट आहे. माझा जर एखादा दावा आहे. परमिशनसाठी मी कोर्टात भांडत गेलो. मी परमिशनसाठी अर्ज करतो, तुम्ही सगळे कन्सीडर करायचे.

**मा. सभापती :-**

हा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव मंजूर आहे म्हणजे काय? ह्याच्यामध्ये माझी हरकत नोंदवा. न्यायालयाची स्थगिती असतानासुध्दा.

**एस. ए. खान :-**

मा. सभापती साहेब, ऑर्डर जूनी आहे ना.

**नयना म्हात्रे :-**

ह्याच्यामध्ये माझे पण नाव घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तुम्ही ह्याच्यावर मतदान घ्या. आम्हाला मतदान करायचे आहे.

**मा. सभापती :-**

तुमचा विरोध मांडतो ना. मतदान कशाला करायचे?

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही आता बोललात ना मंजूर आहे. आम्हाला विरोध करायचा आहे.तुम्ही ठराव मतदानाला घ्या.

**मा. सभापती :-**

तुमचा विरोध मांडतो ना.

**मिलन म्हात्रे :-**

सचिव साहेब, तुम्ही डिक्लेर करा. ज्यांचा विरोध आहे त्यांनी विरोध करावा. हे बघा, त्यांनी कोर्टात जावे. त्यांनी साडे सात हजार रु., १० हजार रु., २० हजार रु. मागितले आणि कोर्टाने कन्सीडर केले तर आपल्याला देणे गरजेचे आहे. आमचं मतदान घ्या आणि तुम्हाला जे योग्य वाटत असेल ते करा. त्यांनी लेबर कोर्टात अप्लाय करावे की, मला मानधन वाढवून द्या. कोर्टाने वाढवून द्यावे ना. १७ हजार रु. काय आम्ही २० हजार रु.द्यायला तयार आहोत. कोर्टाची ऑर्डर द्या. आम्ही पटकन मंजूर करतो. त्यांनी कोर्टात जायचे ॲप्लीकेशन पण लावायचे आणि तुम्ही तिकडे न्यायप्रविष्ट बाबी बघणार. आम्ही मतदान करणार नाही. त्यांनी ऑर्डर घेवून यावी.

**मा. सभापती :-**

ह्याच्यावर मी तुमचा विरोध मांडतो.

**मिलन म्हात्रे :-**

सचिव साहेब, तुम्ही डिक्लेर करा की, ठरावाला कोणाकोणाचा विरोध आहे. मग आम्ही विरोध देतो. तुम्ही ज्या दिवशी कोर्टमॅटर टाकता, त्यावेळेला प्रशासनातर्फे सर्व सदस्यांना टिपणीतर्फे कल्पना दिली. कोर्टमॅटर चालू आहे आणि पेन्डीग आहे. आता पुढचा विषय पण तसाच आहे.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, जेव्हा हे कोर्टात मॅटर आहे तर हा विषय आणाला कसा? असे विषय आणू शकतो का?

**मिलन म्हात्रे :-**

हा विषय येवू पण शकत नाही.

**शरद पाटील :-**

विधी सल्लागाराने सांगावे ना. जर कोर्टात मॅटर चालू असेल तर विषय येवू शकतो का? आम्ही आजपर्यंत ऐकले की, कोर्टाचे मॅटर असेल तर ते इथे बोलायचे नाही. असे आम्हाला सांगितलेले आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

विषयपत्रिकेवर विषय कसा आला?

**शरद पाटील :-**

कोर्टाच्या आधीन राहून तुम्हाला जे काय करायचे ते करा. मा. आयुक्त साहेबांना द्यायचे असेल तर वाढवून देवू शकतील.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

ठरावामध्ये तसे दिले की, कोर्टाच्या आधीन राहून.

**शरद पाटील :-**

आमचा याला विरोध आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आमची ह्याच्यात सुचना लिहा की, विरोध का करतोय? तो जो सिन्हा नावाचा सर्व्हेअर आहे त्याची स्वतःची पिटीशन चालू आहे. अजून फायनल निर्णय झालेला नाही. अंडर ट्रायलमध्ये ती केस आहे असे असताना अनिर्णित अवस्थेत जी केस आहे त्याच्यामध्ये आम्ही हस्तक्षेप करणार नाही. त्यांनी कोर्टात जावे. त्यांचे जे काय म्हणणे आहे ते मांडावे. ते मांडलेले नाही. म्हणून आम्ही विरोध करतो.

**मा. सभापती :-**

ठराव वाचून ज्यांचा विरोध आहे त्यांचा विरोध नोंदवून ठराव मंजूर करा.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६१ च्या ठरावाला ज्यांचा विरोध असेल त्यांनी हात वर करायचे. तीन लोकांचा विरोध आहे आणि बाकीच्या लोकांच मंजूरी आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सचिव साहेब, मला जरा विधी अधिकाऱ्यांनी सांगावे की, अधिन म्हणजे काय/

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलते. सदर दाव्यात जर मा. न्यायालयाने त्यांची जी प्रेयर आहे ती फेटाळली तर आपण त्यांना पगार काय कामावरुन काढूनच टाकणार ना.

**नयना म्हात्रे :-**

आता कोर्टाने ऑर्डर दिले का की, त्यांना कामावरुन काढून टाकावे.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही पण तेच म्हणतो. मॅडम, तुम्ही विधी अधिकारी म्हणून जबाबदारीने उत्तर द्या. आम्ही ऑनर करतो. हे तुमचे दुसरे का तिसरे प्रकरण आहे. अशी उत्तरे मेहरबानी करुन देवू नका. त्याच्यामध्ये त्यांनी तुम्हांला मुदतवाढ देणे हे दाखवले का?

**मा. सभापती :-**

आम्ही लिहले, प्रश्न मंजूर झाला.

**मिलन म्हात्रे :-**

न्यायालयीन प्रकरण जे आले ना तो विषय बरोबर नाही. तो माणूस कोर्टामध्ये सर्व्हिस करिता गेला हे लक्षात घ्या.

**मा. सभापती :-**

हरकत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हाला हरकत नसेल, आम्हांला आहे.

**मा. सभापती :-**

तुमचा विरोध ह्याच्यामध्ये लिहिला ना.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्या पगारवाढीव बद्दल काय?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

त्यांचे पगारवाढीव बद्दल काय प्रेयर नाही.

**मिलन म्हात्रे :-**

न्यायालयाचे निर्णय. त्यांची प्रेयर आहे.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

नाही. त्यांचे म्हणणे असे आहे की, माझे २४० दिवस पूर्ण झालेले आहे. तर मला परमनन्ट करण्यात यावे.

**मिलन म्हात्रे :-**

पगार वाढवा वगैरे काय?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

नाही. तसे काही नाही.

**मिलन म्हात्रे :-**

ठिक आहे.

**प्रकरण क्र. ६१ :-**

श्री. मनोज सिन्हा (सर्वेअर) यांना मासिक ठोक मानधनात वाढ करणेबाबत.

**ठराव क्र. ५६ :-**

महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत विविध विकास कामे पार पाडण्यात येत असून त्यात महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते, गटारे, इतर बांधकामे करण्यासाठी प्रत्यक्ष जागेवर जावून लाईन आउट देणे, लेव्हल घेणे, डि.पी. नुसार आणखी करणे इत्यादी कामाकरीता त्यावेळी कामाचा वाढलेला व्याप पाहता कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी केलेल्या मागणीनुसार तांत्रीक कर्मचारी अपूर्ण असल्याने जाहिर वृत्तपत्रात जाहिरात देवून जाहिरातीचे अनुषंगाने श्री. मनोजकुमार सिन्हा यांनी दि. ११/११/२००२ रोजी महानगरपालिकेजवळ अर्ज सादर केला होता. त्या अर्जाच्या अनुषंगाने मा. स्थायी समिती सभा दि. २८/११/२००२ ठराव क्र. ४५ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार प्रथम त्यांना दि. ०२/१२/२००२ पासून ठोक रु. ७५००/- या मासीक मानधनावर नियुक्ती करण्यांत येवून त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाचे आवश्यकता

असल्याचे मागणीनुसार मा. स्थायी समितीच्या मान्यतेने वेळोवेळी मुदतवाढ देण्यांत आलेली होती. दरम्यान त्यांनी महानगरपालिकेत कायम होण्यासाठी दि. २०/०३/२००५ रोजी मा. औद्योगिक न्यायालय ठाणे येथे १३८/०२००५ दावा दाखल करुन प्रकरण न्यायप्रविष्ठ केले. सद्यस्थितीत प्रकरणात स्थगित आदेश असल्याने त्यांना पूर्वीच्या ठोक दराने मानधन देण्यात येते. परंतु त्यांनी दि. ०४/०८/२००८ रोजी विनंती अर्ज सादर करुन महागाई वाढलेली असून आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे मासीक मानधन रु. १२,०००/- पर्यंत वाढवून मिळणेसाठी विनंती केली आहे.

श्री. मनोजकुमार सिन्हा, सर्वेअर हे दि. ०२/१२/२००२ पासून ठोक मानधन रु. ७५००/- वर आजपर्यंत कार्यरत असून यांनी मानधन वाढवून मिळणेबाबत केलेल्या अर्जावर कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी रु. १२,०००/- मासीक मानधन वाढवून देण्यास शिफारस केलेली आहे. त्या अहवालास मा. आयुक्त सो., यांची मान्यता असून प्रकरणात वस्तुस्थिती पाहता महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सर्वेअर हे पद रिक्त नाही. परंतु, प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने त्यांनी वाढीव मानधनाची केलेली मागणी विचारात घेता मंजुर 'सर्वेअर' या पदाची वेतनश्रेणी रु. ४०००-१००-६००० अशी असून सर्वेअर या पदाच्या किमान रु. ४०००/- या वेतन दराप्रमाणे स्थायी पदाचे सर्व वेतन व भत्ते एकत्रीत करता श्री. मनोजकुमार सिन्हा (सर्वेअर) यांना रु. १०,०००/- ठोक मासीक मानधन २६ दिवसांकरीता प्रदान करणेस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन :- श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे**

**श्री. मिलन वसंत म्हात्रे यांनी पुढील कारणाकरीता या ठरावास विरोध दर्शविला.**

मानधनात वाढ देण्यास विरोध असल्याची सुचना उपरोक्त प्रकरणी मा. आद्योगिक न्यायालय, ठाणे येथे १३८/०२००५ हा दावा दाखल केलेला आहे. याच न्यायालयीन दाव्यात श्री. मनोजकुमार सिन्हा (सर्वेअर) यांना ठोक मासिक मानधनावर वाढ करण्यासाठी कोणताही स्पष्ट आदेश देण्यात आला नाही. श्री. मनोजकुमार सिन्हा यांनी त्यांचे मानधन वाढवून मिळावे म्हणून न्यायालयात लेखी विनंती अर्ज केलेला नाही. महानगरपालिका प्रशासनास न्यायालयानी कोणताही स्पष्ट आदेश न देता त्यांच्या मानधनात वाढ करणे उचीत ठरणार नाही. त्या करीता मी माझा विरोध या ठरावास करीत आहे.

| अ.क्र. | ठरावाच्या बाजुने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ सदस्य |
|---|---|---|---|---|
| १) | श्री. रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | १) | श्री. मिलन वसंत म्हात्रे | निरंक |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | २) | श्रीम. नयना म्हात्रे | |
| ३) | श्री. ॲड. एस. ए. खान | ३) | श्री. शरद केशव पाटील | |
| ४) | श्रीम. शानु गोहिल | | | |
| ५) | श्रीम. सुनिता कैलास पाटील | | | |
| ६) | श्री. शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| ७) | श्री. ध्रुवकिशोर पाटील | | | |
| ८) | श्री. टेरी पॉल परेरा | | | |
| ९) | श्री. प्रशांत पालांडे | | | |
| १०) | श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे | | | |

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६२, महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांना दिलेली भ्रमणध्वनी सेवा बंद करणेबाबत.

**प्रशांत पालांडे :-**

प्रशासनाचे काय म्हणणे आहे? मोबाईल द्यायचे की नाही?

**मिलन म्हात्रे :-**

मोबाईल देणे हे जी.आर.मध्ये नाही. तुम्ही त्यांना इनकमिंग द्या. आउटगोईंग बंद करा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कर्मचारी हे कन्टीन्यु कामावर आहे.

**प्रशांत पालांडे :-**

आता आपण सगळ्या अधिकाऱ्यांचे मोबाईल सर्क्युलेट केले. काही ......

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

येतील ना. आम्ही परत ते नंबर सर्वांना सर्क्युलेट करु ना.

**मा. सभापती :-**

मोबाईल कॅन्सल.

**मिलन म्हात्रे :-**

इन्कमिंग चालू ठेवा आणि आउटगोईंग बंद ठेवा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

महिन्याला बिल किती येते? ८० हजार रु. दिले ना म्हणजे अडीच लाख फक्त. १० लाख रु. खतगावकर साहेब, आपण मोबाईल का दिले होते कारण ह्यांच्याशी संपर्क साधण्यासाठी. समजा, उद्या या अधिका-यांनी मोबाईल बंद केले आणि बोलले आमच्याकडे मोबाईलच नाही. मग आम्ही कॉन्टॅक्ट कसे करणार?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

साहेब, तक्रारी जास्त आहेत ना. येत नाही म्हणून.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्ही आजही बारकुंड साहेबांना रात्री फोन करतो. त्यांचा फोन चालू असतो. आजही पाणी आले नाही. आम्ही त्या इंजिनिअरला फोन करतो. ह्याच्यामध्ये काही तरी दुसरा मार्ग काढा. मा. सभापती साहेब, हे अधिकारी मोबाईल बंद ठेवण्याची मागणी करतात. साहेब, आपण मोबाईल बंद केला ना. हे लोक आपले ऐकणार नाहीत. पाणी हा महत्वाचा विषय आहे. कचरा, साफसफाई तर आम्ही त्या ऑफीसशी कॉनटॅक्ट कसे करणार? तुम्ही ऑफीसमध्ये काटकसर करा. आम्हाला काही दुमत नाही. पण साहेब, आपण ह्याच्यातून काही सोल्युशन काढू ना. साहेब, ही जी स्कीम आहे ना ही फक्त इन्कमिंग ठेवा. आउटगोईंग बंद करा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ह्याच्यामध्ये अधिका-यांचे जे पर्सनल नंबर आहेत त्यांची सूची तयार करुन सर्वांना नंबर दिले जातील. प्रशासनातर्फे सर्व सदस्यांना विभाग प्रमुखांचे नंबर आम्ही सर्क्युलेट करु.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आपल्या पाणी डिपार्टमेन्टचा इंजिनिअर आहे त्यांचा तुम्ही मोबाईल चालू करणार का? पाणी पुरवठा विभागाचा इन्चार्ज आहे. सॅनेटरी इन्स्पेक्टर आहे. त्याच्या मोबाईलचे काय?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

संबंधित सर्व अधिकारी रिस्पॉन्सीबल आहेत. त्याची सुची तयार करून सर्वांना सर्क्युलेट केली जाते.

**शरद पाटील :-**

खतगांवकर साहेब, एखाद्या अधिका-याने सांगितले आमची ऐपत नाही. आम्ही मोबाईल घेणार नाही. मग काय करायचे? तुम्ही इनकमिंग ठेवा ना. लोक आम्हाला विचारतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सर्व अधिका-यांचे मोबाईल चालु ठेवण्यात यावेत असा मी ठराव मांडत आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

मोबाईल चालू ठेवा.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यामध्ये तुम्ही इनकमिंग आणि आउटगोईंग बद्दल बोला. तुम्ही आउट गोईंग बंद करा. तुम्ही वाटेल तसे निर्णय घेवू नका. जी.आर.मध्ये, माहितीच्या अधिकारामध्ये मोबाईल सेवा देणे हे तुमच्या कनसर्न मध्ये नाही. इनकमिंग ठेवा. आउटगोईंग बंद करा. ठराव तोच केलेला आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हे पहा. जसा वाहनाचा ठराव होता. तसाच हा पण ठराव स्थायी समितीतुन मान्यता होउन इम्प्लीमेंट झाले होते. तर ह्या ही मॅटरमध्ये काही सदस्यांच्या काही, नागरिकांच्या तक्रारी आल्या. पण ह्याच्यावर शासनाने धोरण विचारात घेता स्टँडींग धोरण नसल्यामुळे आपल्या सर्वांची त्यावेळी सुचना विचारात घेउन हा निर्णय फायनल केला होता. म्हणून हा विषय परत फेरविचाराला स्थायी समितीसमोर आणलेला आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

चालू ठेवा बोलले ना.

**शरद पाटील :-**

नियमानुसार इनकमिंग चालू ठेवावा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ह्यांच्या तक्रारी काय की, नियमबाह्य केला म्हणून आम्ही हा विषय आणलेला आहे.

**शरद पाटील :-**

नियमात बसून इनकमिंग चालू ठेवा. आउटगोईंग बंद करा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

डायरीमध्ये अधिकाऱ्यांचे नंबर छापलेले आहे. तुम्ही डायऱ्या प्रसिद्ध केल्या लोकांपर्यंत पोहचवल्या. तर आता तुम्ही मोबाईल बंद करून काय दाखवणार आहात.

**दिपक खांबित :-**

आमचा पर्सनल नंबर देणार ना.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

डायरीमध्ये जे नंबर नमुद केले. त्याचे काय?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

इसमे वॉटर डिपार्टमेंट सेनेटरी इन्स्पॅक्टर ॲन्ड इंजिनियरिंग मस्ट है।

**मा. सभापती :-**

डिसेंबर पर्यंत ह्यांचे मोबाईल चालू ठेवू या. नविन डायरी निघे पर्यंत दुसरे मोबाईल येईल. मग ते नंबर आपण नविन डायरीमध्ये घेवू. सर्व अधिकाऱ्याने मोबाईल चालू ठेवायचे.

**प्रकरण क्र. ६२ :-**

महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांना दिलेली भ्रमणध्वनी सेवा बंद करणेबाबत.

**ठराव क्र. ५७ :-**

सर्व अधिकाऱ्यांचे मोबाईल चालु ठेवण्यात यावेत असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.        अनुमोदक :- श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६३, वाहनचालक यांचे ठोक मानधनात वाढ करणेबाबत.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, चार ड्रायव्हर जोडीला होते. त्यातले दोन ड्रायव्हर परमनंट केले. आणि दोन तसेच ठेवले. तर हे आम्हाला समजल नाही. प्रशासनाने आम्हाला समजवून सांगावे.

**गोविंद परब :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरती चार वाहन चालक पहिल्यांदा कार्यरत होते. ते चार वाहन चालक १९९४ साली पासून ठेका पद्धतीत होते. पाणी पुरवण्याच्या अत्यावश्यक सेवेसाठी आवश्यकता असल्यामुळे तेव्हापासुन त्यांना वेळोवेळी मुदत वाढ देण्यात आली. त्यातले प्रथम श्री. प्रकाश पाटील आणि श्री. विलास साळवी हे एम्प्लॉयमेंट आणि सेवेच्या कार्यालयाकडून आले होते. त्यानंतर त्यांची मुदत संपल्यानंतर महापालिकेच्या जास्त आवश्यकता वाटली. चार पाहिजे होते. म्हणून पेपरला जाहिरात देवून त्यांची ती एम्प्लॉयमेंटची स्किम होती. ती बंद करून पेपर मध्ये जाहिरात दिली त्यानंतर चार जणांना नविन घेतले.

**प्रशांत पालांडे :-**

डायरेक्ट सेवेवरती घेतले ना हे ठेक्यावर नाही ना.

**गोविंद परब :-**

ते पहिल्यापासुन मानधनावरती आहेत.

**नयना म्हात्रे :-**

तुम्ही आता किती लोकांना परमनन्ट केले.

**गोविंद परब :-**

त्यानंतर चार लोकांना बोलावले. मुदतवाढ दिल्यानंतर महापालिकेच्या आस्थापनावरती आठ वाहन चालकांची पदे मंजुर होउन आली. दरम्यान आपल्याकडे सरळसेवा भरतीचे प्रमाण ७५ टक्के होते आणि पदोन्नतीचे २५ टक्के होते. मग आपल्या महानगरपालिकेनुसार बदलले आणि मग ते ५० टक्के, ५० टक्के वाहन चालकाचे केले. त्यामुळे फक्त सरळ सेवेसाठी दोनच वाहनचालकाची पदे रिक्त राहिली. चार पदोन्नतीला गेली आणि चार सरळ सेवेला गेली. पदोन्नतीला रिक्त राहिली नाही. त्यामुळे सरळसेवेला घालण्याची चार पदे. आठ पदांपैकी चार पदे मंजुर झाली आणि चार पदे गेल्यामुळे आम्ही रोस्टर तयार केले. त्यामध्ये दोनच पदे रिक्त राहिली. त्यामुळे चार लोकांना सामावून दोन पदांना घेता येत नाही. मग, आम्ही

पेपरला जाहिरात देवून महापालिकेत अर्ज मागवला आणि एम्प्लॉयमेंटचे नाव आले. त्यामध्ये चार लोकांपैकी तीघांनी अर्ज भरले होते. श्री. विलास साळवी ह्यांनी अर्ज भरला नव्हता. सरळ सेवेच्या भरतीसाठी. गम त्या तीघांचेच इंटरव्युव्ह झाले. त्यापैकी दोघांना घेतले. श्री. प्रकाश पाटील आणि श्री. सदानंद धुरी ह्यांची निवड केली आणि लोनेस्ट यांना वेटींग लिस्टवर ठेवले. पद दोनच असल्यामुळे तीघांपैकी दोघांनाच घेतले आणि एकाला वेटींगला ठेवले कारण सध्या आपल्याकडे पद रिक्त नाही. त्यामुळे त्यांची जागा.....

**नयना म्हात्रे :-**

तुम्ही पेपरला जाहिरात दिली. तुमच्याकडे किती लोकांनी फॉर्म दिले.

**गोविंद परब :-**

१४ लोकांनी फॉर्म दिले.

**नयना म्हात्रे :-**

तुम्ही त्या १४ लोकांना इंटरव्युव्हला बोलावले होते का? त्या १४ लोकांची मला नावे सांगा. तुम्ही या सभागृहामध्ये माहिती देता. जरा दहा वेळा विचार करून तुम्ही माहिती द्या. तुम्ही पेपरला जाहिरात दिली आणि ज्या लोकांनी तुम्हाला अर्ज दिले. त्या त्या लोकांना तुम्ही इंटरव्युव्ह ला बोलावले नाही.

**गोविंद परब :-**

सगळ्यांना कॉल पाठवले.

**नयना म्हात्रे :-**

मी तुम्हाला प्रुफ करून देते. तुम्ही मला चॅलेंज करता? तुम्ही खोट बोलता. गणेश यशवंत म्हात्रे ह्यांचा देखिल अर्ज तुमच्याकडे आला. तुम्ही त्यांना इंटरव्युव्हला बोलावले.

**गोविंद परब :-**

हो. पोस्टाने पाठवले.

**नयना म्हात्रे :-**

पोस्टाने पत्र नाही गेले. ही तुमची चुकी आहे. तुमच्या प्रशासनाची चुकी आहे. ते दोघे जण परमनंट कसे झाले? त्या दोघांना डावळून तुम्ही त्या दोघ माणसांची हुशारी मारता. ह्या दोन माणसांना घेतले त्यांना घेतले नाही. हे सगळे तुमचे सेटलमेंट झाले. तुम्ही उलटे सुलटे उत्तर देवू नका. त्यांच्या पेक्षा अगोदर असलेल्या कर्मचाऱ्यांना तुम्ही कामावर घेतले नाही. ज्या माणसांनी तुम्हाला अर्ज दिला की, मला इंटरव्युव्हला बोलवा. तुम्ही त्याला इंटरव्युव्हाला बोलावले नाही. दोघांना डावळून दिले. तुमच्या अधिकाऱ्यांकडून तुम्ही त्यांना परमनंट केले. श्री. प्रकाश पांडूरंग पाटील यांना महापालिकेमध्ये मी कामाला लावले. त्यावेळेला नगरसेवक गजानन देसाई होते.

**प्रशांत पालांडे :-**

चौघांपैकी दोघच कसे काय शिल्लक राहिले? इंटरव्युव्हला किती जण आलेली? कुठल्या पेपरमध्ये जाहिरात दिलेली.

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, ह्या केसमध्ये मा. सर्व साधारण सभा दि. २५/०९/२००१ ठराव क्र. ३६९ (३) वाहन चालकांची सेवा कमी करू नये. अशी मंजुरी दिलेली आहे. दरम्यान दाव्याचा निकाल महापालिकेच्या बाजुने लागला म्हणजे त्यांच्या विरोधात लागला. चार कन्डेटच्या त्या लोकांनी औद्योगिक न्यायालयाच्या दाव्यास म्हणजे त्या निकालास मा. उच्च न्यायालयाला आव्हान दिले आता त्या आव्हान दिलेल्या न्यायालयाने त्यांची योग्य कायदेशिर कारवाई केल्याशिवाय कमी करू नये. आपण ह्यांना कमी केलेले नाही.

**गोविंद परब :-**

स्टे दिला.

**मिलन म्हात्रे :-**

बरोबर ना. स्टे चा अर्थ कसा आहे की आहे जशी परिस्थिती तसे तुम्ही ठेवा. आज टरमिनेट द सर्व्हीस विदाउट फॉलॉविं द प्रोसेस ऑफ लॉ. असे तुमचे इंग्लिशमध्ये आहे. आता त्या प्रोसेस ऑफ लॉ मध्ये तुमचे आले का? ज्या प्रकरणामध्ये स्थगिती मिळालेली आहे. ते तसेच ठेवायचे आता कसे असते की, लोकांनी न्यायालयात जायचे स्थगिती मिळवायची नंतर त्यांना जे काय पाहिजे ते सगळे फायदे महापालिकेच्या वतीने काढायचे. आता, मागचा ठराव तसाच होता. म्हणजे आता हायकोर्टाने द प्रोसेस ऑफ लॉ करायला तुम्हाला स्थगिती दिलेली आहे. मला एक सांगा त्या केसमध्ये उच्च न्यायालयाने जी स्थगिती दिले. त्याचा कनटेन्ट द्यायला वाटत नाही का?

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, त्या दिवशी आम्ही बरेचशा नगरसेवकांनी मा. महासभेत सुद्धा हा विषय काढला होता. मा. आयुक्त साहेबांना असे सुद्धा सांगितले होते की, तुम्ही त्या प्रकरणी संपूर्ण चौकशी करा.

**मा. सभापती :-**

करत असतील.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही एवढे लाईटची घेवू नका. तुम्हाला स्पष्ट सांगतो, ह्याच्यामध्ये त्यांनी जो अर्ज केला त्याच्यात सुद्धा अर्ज केला आहे. हा जो विषय आहे ना तर हायकोर्टामध्ये चारही जण गेले. त्यांना परमनंट करायचे आहे. त्यांनी त्या केसमध्ये रिन्यु होण्याकरिता अर्ज केला पाहिजे की मला रिन्यु करा किंवा कमी करा. त्याच्यातले माझे नाव वगळा. ही ठेक्या पद्धतीची नोकरी सोडून परमनंट त्या सेवेयोजनेत कामाला लागायचा. म्हणून मी ह्या नोकरीचा राजीनामा देतो किंवा मी उद्यापासुन कामावर येणार नाही, न्यायालयाने मंजुरी द्यावी. ती दोन नावे मंजुरीची आली पाहिजे होती. त्यानंतर त्यांची नियुक्ती झाली पाहिजे. म्हणजे इकडे कसे त्यानंतर त्यांची नियुक्ती झाली पाहिजे. म्हणजे इकडे कसे आहे की, ठेका पद्धतीची कोर्ट केस पेंडींग आणि इकडून तुम्ही एम्प्लॉयमेंट ॲक्शन तर्फे कामावर लागतात. उद्या जर कोर्टाने हे प्रकरण मागवले की, हा काय प्रकार आहे. आता दोन जे रिजेक्टेड झाले. पान मागचे सेन्टेन्स तुम्हाला वाचून दाखवतो. प्रकाश पाटील आणि सदानंद धुरी यांना आस्थापनेवर यांची कायम स्वरूपी नेमणूक करण्यात आली. त्यांनी न्यायालयीन दावा मागे घेत असल्याबाबत त्यांच्या वकीलांस कळविलेले आहे. वकीलाला कळवून काय करणार? असल्याबाबत वकीलास कळविले असून चार ही वाहन चालकांचा दावा न्यायप्रविष्ट असल्याने मा. उच्च न्यायालयाने दिलेली स्थगिती आदेशान्वये सुनिल अनिष्ट आणि विलास साळवी या दोन वाहन चालकांना ठोक मानधन तुम्ही तिकडे परत म्हणता की, त्याला स्थगिती दिले म्हणून तुम्ही त्यांना ठोक मानधन देता. चारपैकी फक्त दोघांना आणि दोघांना परमनंट केले. म्हणजे त्याच्यामध्ये तुमची जी स्टे आहे ना ती अचानक दोन वगळले गेले आणि चार मधून दोन गेले आणि त्या दोघांचेच तुम्ही बोलता. केस ही चौघांची आहे. बोलता दोघांबद्दलच. इफेक्ट दोघांना देता आणि परमनंन्ट केले. दोघांना इफेक्ट टेम्परारी दिलेला आहे. परत प्रकरण न्याय प्रविष्ठ बोलता. माझा त्या ठरावावरती विरोध आहे. त्यांचे जे काय असेल ते प्रशासनास कोर्टामध्ये हजर करावे. त्या केससाठी एप्लीकेशन करावे. महागाईसाठी त्यांचा अर्ज केलेला आहे. आम्हाला ह्यांचे आहे त्या पद्धतीमध्ये ठोक मानधन वेतन म्हणा ते वाढवून द्यायला न्यायालयाने आदेश द्यावे. २००५ करिता तुम्ही न्यायालया कडे अर्ज करा. आणि ऑर्डर घेउन या. तिकडे प्रकरण पेंडींग आणि इकडे सगळ चर्चेला. त्यांनी न्यायालयाचा आदेश आणावा जे काय पैसे वाढवायचे आहे ते आणि तुम्ही कोर्टामध्ये ते पण दृष्टीमध्ये आणा की, ह्या चार जणांचे मॅटर पेंडींग असून सुद्धा आम्ही दोघांना परमनंन्ट बेस वर घेतलेले आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब, न्यायालयीन ऑर्डर आणायला वर्ष लागतात. मग आपण आता दोन तीन हजार रू. पगारामध्ये कसे राहू शकतात?

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी लवकर करायला पाहिजे. तुम्ही पास कराना. मी कुठे नाही बोलतो. माझा विरोध नोंदवून घ्या. तुम्ही पास करा. आज दोन वर्ष झाली त्याला ३ हजार रू. पगार आहे. दोन वर्ष तुमचे प्रशासन झोपले होते का? दोन वर्षाचे तीन महिन्यात ऑर्डर आली होती. त्याची तारिख किती आहे?

**प्रशांत पालांडे :-**

श्री. प्रकाश पाटील आणि सदानंद धुरी यांचे स्पष्टीकरण देतात. उरलेल्या दोघांना परमनंन्ट केली तरी काही हरकत नाही. त्यांची नियुक्ती कशी झाली याचे स्पष्टीकरण द्यावे.

**मिलन म्हात्रे :-**

ते सुद्धा चुकीचे आणि हे सुद्धा चुकीचे आहे. ही परिस्थिती आहे ना ही न्याय प्रविष्ठ प्रकरण तुम्ही सभागृहापुढे आणता ना. ह्याचे आम्हाला फार वाईट वाटते.

**तुळशीदास म्हात्रे :-**

वास्तविक म्हणजे हे जुनी लोक आहेत. ह्या लोकांना डावळून केलेले आहे.

**नयना म्हात्रे :-**

बरोबर आहे. ही डावळून केली आणि दोन नविन परमनंन्ट केली. जुनी तशीच राहिली.

**प्रशांत पालांडे :-**

दोघांना वाढवायचे आहे की, नाही.

**मिलन म्हात्रे :-**

पगार वाढवायला आपली हरकत नाही. त्यांनी कोर्टात जावे ॲप्लीकेशन द्यावे. प्रशासनाने त्याला कोर्टामध्ये कन्सीडर करावे ना. कोर्ट काय विचारणार. ह्यांनी पाच हजार रू. किंवा आठ हजार रू. ची मागणी केली. तुम्हाला मान्य आहे का? मान्य आहे. दॅट्स ऑल. ती ऑर्डर आली की, तर दुसऱ्या ठिकाणी पगार द्यावे.

**गोविंद परब :-**

१४ लोकांना आम्ही कॉल पाठवलेले होते. त्याची पोच माझ्याजवळ आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

पोच आहे. मग तुम्ही त्या दोन लोकांना डावळले का?

**गोविंद परब :-**

तो निर्णय माझा नाही. हा निर्णय निवड समितीचा आहे. जागा दोनच होत्या.

**मिलन म्हात्रे :-**

तुमची जी निवड समिती आहे ना. त्यालाच शासनाची मान्यता नाही. ती निवड समिती अवैध आणि बेकायदेशिर आहे. तुम्ही कुठलीही कमिटी बनवल्यावर शासनाकडे त्या नावाचा त्या पदाचा प्रस्ताव पाठवायचा आणि त्याची मंजुरी घेउन आल्यानंतर ती कमिटी ॲक्ट करते. आणि त्यांनी घेतलेले निर्णय योग्य आहे ती कमिटी आहे ना तिला मान्यता दिल्याचा मा. आयुक्त साहेबांचा एखादा आदेश किंवा एखाद्याय या महासभेचा ठराव आणि किंवा शासनाची दिलेली मंजुरी ती दाखवा.

**तुळशीदास म्हात्रे :-**

जेव्हा सफाई कामगारांची भरती निघाली होती तेव्हा हजारो लोकांनी फॉर्म भरले होते.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, आपण १७० लोकांची भरती करायची होती. त्यावेळेला आपल्याकडे लाखो फॉर्म आले आणि ह्या ड्रायव्हरच्या भरतीसाठी १३ फॉर्म आहे हे तुम्हाला तरी पटते का हे मला सांगा.

**गोविंद परब :-**

५४ मध्ये निवड समिती ही आयुक्त साहेबांनी केली.

**मिलन म्हात्रे :-**

त्यानंतर काय करायचे आहे? ५४ नंतर तुम्हाला राज्य शासनासाठी तुम्हाला मंजुरीला पाठवायचे आहे. तुम्ही ती कमिटी नेमली. कोणी बघतो कोणी नेमतो.

**मा. सभापती :-**

आपण त्यावेळेला नव्हतो ना. म्हात्रे साहेब, त्यावेळी तुम्ही स्थायी समितीमध्ये सभासद होते. तुम्ही त्यावेळेला हा विषय कसा काय पास केला?

**तुळशीदास म्हात्रे :-**

तेव्हा स्थायी समितीला हा विषयच आला नाही.

**मा. सभापती :-**

हा जुना विषय आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

पण हा स्थायी समितीचा विषय नव्हता आलेला हा कोर्टाचा विषय आहे.

**मा. सभापती :-**

ते परमनंन्ट झाले ते.

**मिलन म्हात्रे :-**

परमनंन्ट चा विषय नंतर आला. त्यांनी पहिला निवड करून कामावर घेतले. मग काढले. स्थायी समितीला हा विषय नाही आलेला.

**नयना म्हात्रे :-**

मा. महासभेमध्ये सुद्धा विषय आला होता त्यावेळेला सुद्धा आमचा विरोध आहे की, हे दोन जण कसे परमनंन्ट झाले आले हे दोन जण कसे डावळले गेले. मा. सभापती साहेब, १३ लोकांची इंटरविव्ह घेतले त्याच्यामध्ये फक्त हे दोघेच पास झाले आणि बाकीचे नापास झाले का?

**तुळशीदास म्हात्रे :-**

आपण सगळ्या लोकांनी निवडणूकीच्या कालावधीत भरती केली ते सगळे कॅन्सल करा. शासनापर्यंत जायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

अजुन वेळ गेलेली नाही. एक ठराव केला की चालले घरी. ठराव करा ना. नुसते बोलू नका. तुम्ही आपल्या ठरावामध्ये गॅझेट ऑफिसर नेमले. तुम्हाला गॅझेट ऑफिसर नेमायचा काय अधिकार आहे. मी सभागृहामध्ये मी एकट्याने विरोध केला. गॅजेटेड ऑफिसर नेमायचा. कुठल्या नगरसेवकाला कुठल्या महापौराला अधिकार आहे ते सांगा. कुठल्या कायद्यात आहे ते ही सांगा. तुमच्या बी.पी.एम.सी. ॲक्ट मध्ये ती प्रोव्हीजन कुठे ही नाही. तुम्ही का नेमलात तेव्हा आमच्या बरोबरीने उभे राहिले नाही.

**नयना म्हात्रे :-**

तुम्ही त्यांना मानधन वाढवणार त्याला माझा विरोध आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यात सेप्रेट केस आहे. दोन जण परमनंन्ट झाले. त्यांचा प्रश्नच येत नाही. जे दुसरे दोन राहिले त्यांचे मानधन वाढवायला आमचा काही विरोध नाही. ती माणसे कोर्टात गेले ना त्यांनी कोर्टात ॲप्लीकेशन करावे ना आणि त्यांना महापालिकेला कोर्टात ना हरकत द्यावी. आम्ही काय चुकीचे बोलतो ते तुम्ही सांगा ना.

**नयना म्हात्रे :-**

त्यांनी कोर्टातुन ऑर्डर आणावी.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. सभापती साहेब, मगाशी पण कोर्टातला विषय हा विषय पत्रिकेवर आला. चर्चा झाली आता पुन्हा कोर्टातला विषय येतो हे ही विषय घेतात त्यावेळी तुम्ही चौकशी करूनच मिटींगमध्ये विषय आणा ना. असे विषय आणता कशाला?

**मिलन म्हात्रे :-**

त्या टिपणी मध्ये न्याय प्रविष्ट बाब आहे. हे सगळ आपल्याला दिलेले आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, प्रशासन कुठे ही अडचणीत येत नाही. फक्त नगरसेवकाला सगळे लेखी देतात. मग हात बांधून घेतात. तुम्ही ठराव करा. म्हणजे उद्या कोर्टासमोर होईल की, नगरसेवकांनी केले.

**प्रशांत पालांडे :-**

मा. सभापती साहेब, हे दोघे आहेत त्यांना पगार वाढ द्या आणि बाकीचा विषय बाजुला ठेवा.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही ते निट वाचून घ्या. ते लोक कोर्टात गेले. मा. सभापती साहेबांनी असे रूलिंग द्यावे. ते जे कोणी इफेक्ट आहे त्यांनी येत्या तारखेला ॲप्लीकेशन करावे.

**टेरी परेरा :-**

सन १९९४ मध्ये पाणी पुरवठा विभागात नगरपालिका परिसरात पाण्याची तिव्र टंचाई असल्याने टँकरद्वारे पाणीपुरवठा नागरिकांना ठिक ठिकाणी सुरळीत होण्याचे दृष्टीने टँकरवर वाहनचालकाची अत्यंत निकड असल्याने श्री. विलास हरिभाउ साळवी यांना समाजकल्याण विभागाकडील व श्री. प्रकाश पांडूरंग पाटील हे रोजगार व स्वयंरोजगार केंद्राकडील प्राप्त यादीतुन मुलाखतीद्वारे निवड करून तात्पुरती अस्थायी स्वरूपात वाहन चालक पदावर नेमणूक केली होती. त्यानंतर त्यांना वेळोवळी पाणीपुरवठा विभागास त्यांची आवश्यकता लक्षात घेता मुदतवाढ दिलेली आहे. दरम्यान पाणी पुरवठा विभागास जादा वाहन चालकाची आवश्यकता असल्यायने वृत्तपत्रात जाहिरात देवून निविदा मागविण्यात आल्या त्या निविदानुसार पुढीलप्रमाणे वाहन चालक यांना मा. स्थायी समिती सभा दि. ०३/०८/२००० ठराव क्र. २०६ अन्वये अनुक्रमे १) श्री. विलास साळवी २) श्री. प्रकाश पाटील ३) श्री. सदानंद धुरी ४) श्री. सुनिल लोनुष्टे यांना दि. ३१/०३/२००१ पर्यंत दरमहा (२६ दिवस) रू.३,०००/- ठोक मानधन अदा करणेस मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यानंतर त्यांना वेळोवेळी मा. स्थायी समिती सभा व मा. महासभेने मान्यता दिलेली आहे.

दरम्यान सदर वाहनचालक यांनी मुदत संपण्यापुर्वी दि. ०१/०३/२००१ रोजी मा. औद्योगिक न्यायालय ठाणे येथे कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्ेबाबत दावा क्र. १०७/२००१ दाखल केला. त्याअनुषंगे मा. सर्वसाधारण सभा दि. २५/०६/२००१ ठराव क्र. ३६९(३) अन्वये सदर चार वाहन चालकांची सेवा कमी करू नये अशी मंजुरी दिलेली आहे. दरम्यान दाव्याचा निकाल महानगरपालिकेच्या बाजूने झाल्यामुळे त्यांनी मा. औद्योगिक न्यायालयाचे दाव्यास मा. उच्च न्यायालयात आव्हान दिले त्यानुसार मा. उच्च न्यायालयाने त्यांना योग्य कायदेशिर कारवाई केल्याशिवाय कामावरून कमी करू नये (Terminate the sevices without following due process of law) त्यामुळे त्यांना महानगरपालिकेने कमी केलेले नाही. परंतु दि. १८/०८/२००७ रोजी शासनाकडील आदेशान्वये महानगरपालिकेचे आस्थापनेवर आठ वाहन चालकांची पदे मंजुर झाली त्या आठ पदांपैकी ५०ऽ प्रमाणे चार पदे सरळ सेवा व चार पदे पदोन्नतीसाठी ठेवण्यात आली. त्यानुसार बिंदुनमावली मा. सहाय्यक आयुक्त (मावक) कोकण भवन, मुंबई यांचेकडून प्रमाणीत करण्यात आल्यानंतर सरळसेवा बिंदू नामावली नुसार फक्त दोन पदे खुल्या प्रवर्गातील सरळसेवेने भरण्यासाठी रिक्त होती. ती रिक्त वाहनचालक पदे सरळसेवेने भरण्यासाठी दि. ०७/१०/२००७ रोजी दै. सागर व सुरज प्रकाश मध्ये जाहिरात प्रसिद्ध करून उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले होते. त्यात गुणानुक्रमे श्री. प्रकाश पांडूरंग पाटील व श्री. सदानंद गोविंद धुरी यांची निवड करण्यात येवून श्री. सुनिल शांताराम लोनुष्टे यांना प्रतिक्षा यादीत ठेवण्यात आले. या सरळसेवेच्या भरती प्रक्रियेत श्री. विलास साळवी यांनी अर्ज केलेला नाही. तरी वरीलप्रमाणे सरळसेवेची भरती प्रक्रिया करण्यात आल्यानंतर श्री. प्रकाश पाटील व श्री. सदानंद गोविंद धुरी यांना महानगरपालिकेचे आस्थापनेवर दि. २२/११/२००७ रोजीचे आदेशान्वये नेमणूक करण्यात आली. श्री. सुनिल लोनुष्टे हे प्रतिक्षा यादीवर असुन श्री. विलास साळवी यांनी अर्जच केलेला नव्हता.

श्री. प्रकाश पाटील व सदानंद धुरी यांना आस्थापनेवर कायम स्वरूपी नेमणूक करण्यांत आली. त्यांनी न्यायालयातील दावा मागे घेत असल्याबाबत त्यांचे वकीलास कळवविले असुन सद्यस्थितीत चारही वाहनचालकांचा दावा न्यायप्रविष्ठ असल्याने व मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या स्थगिती आदेशान्वये श्री. सुनिल लोनुष्टे व श्री. विलास साळवी या दोन वाहन चालकांचे ठोक मानधन रू. ३०००/- काढण्यांत येत आहे.

सदर प्रकरणी वस्तुस्थिती पहाता महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सरळसेवेने वाहनचालक पदे रिक्त नाहीत तसेच प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे त्यांना कमी करता येत नाही. त्यामुळे श्री. सुनिल लोनुष्टे व श्री. विलास साळवी यांना सदरचे ठोक मानधन हे २००१ पासुन देण्यात येत असल्याने त्यात वाढ करावी या त्यांच्या मागणीचे अनुषंगाने सद्यस्थितीत स्थायी वाहन चालक यांना देण्यात येणाऱ्या वेतनश्रेणीतील किमान

वेतन दरानुसार देय होणारे वेतन भत्ते पहता श्री. सुनिल लोनुष्टे व श्री. विलास साळवी यांना रू. ५,०००/- मासिक ठोक मानधन २६ दिवसांकरिता प्रदान करणेस ही सभा आर्थिक व प्रशासकिय मान्यता देत आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

कोणाचा विरोध आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

माझा विरोध आहे.

**नयना म्हात्रे :-**

माझा सुद्धा विरोध आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

माझा सुद्धा या ठरावाला विरोध आहे.

**मा. सभापती :-**

तीन सन्मा. सदस्यांचा विरोध आहे.

**शरद पाटील :-**

साहेब, न्यायालयीन ला अधिन राहून ठराव मंजुर करा.

**मिलन म्हात्रे :-**

मा. उपायुक्त (मु.) साहेब, त्या लोकांनी हाय कोर्टात पिटीशन फाईल केली. ते पिटीशन पेंडींग आहे. हायकोर्टाने कुठलाही आदेश दिलेला नाही. त्यांना जर पगार वाढ किंवा मानधन वाढवायचे असेल. तर माझे म्हणणे असे की, त्यांनी त्या पिटिशनमध्ये आलेल्या तारखेला ॲप्लीकेशन करावे आणि मान्यता द्यावी. आणि ती ऑर्डर घेवून यावी. तुम्ही जरी मागणी केली तर तुम्ही तसे पत्र दिले पाहिजे. हा विषय तुम्ही आणलेला आहे. माझा विरोध त्याच बेसवर आहे. पगार वाढवण्याबद्दल नाही. प्रक्रिया चुकीची आहे. मी माझा विरोध नोंदवतो तुम्हाला काय ठराव करायचा आहे तो करा.

**प्रकरण क्र. ६३ :-**

वाहनचालक यांचे ठोक मानधनात वाढ करणेबाबत.

**ठराव क्र. ५८ :-**

सन १९९४ मध्ये पाणी पुरवठा विभागात नगरपालिका परिसरात पाण्याची तिव्र टंचाई असल्याने टँकरद्वारे पाणीपुरवठा नागरिकांना ठिक ठिकाणी सुरळीत होण्याचे दृष्टीने टँकरवर वाहनचालकाची अत्यंत निकड असल्याने श्री. विलास हरिभाउ साळवी यांना समाजकल्याण विभागाकडील व श्री. प्रकाश पांडूरंग पाटील हे रोजगार व स्वयंरोजगार केंद्राकडील प्राप्त यादीतुन मुलाखतीद्वारे निवड करून तात्पुरती अस्थायी स्वरूपात वाहन चालक पदावर नेमणूक केली होती. त्यानंतर त्यांना वेळोवळी पाणीपुरवठा विभागास त्यांची आवश्यकता लक्षात घेता मुदतवाढ दिलेली आहे. दरम्यान पाणी पुरवठा विभागास जादा वाहन चालकाची आवश्यकता असल्यायने वृत्तपत्रात जाहिरात देवून निविदा मागविण्यात आल्या त्या निविदानुसार पुढीलप्रमाणे वाहन चालक यांना मा. स्थायी समिती सभा दि. ०३/०८/२००० ठराव क्र. २०६ अन्वये अनुक्रमे १) श्री. विलास साळवी २) श्री. प्रकाश पाटील ३) श्री. सदानंद धुरी ४) श्री. सुनिल लोनुष्टे यांना दि. ३१/०३/२००१ पर्यंत दरमहा (२६ दिवस) रू.३,०००/- ठोक मानधन अदा करणेस मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यानंतर त्यांना वेळोवेळी मा. स्थायी समिती सभा व मा. महासभेने मान्यता दिलेली आहे.

दरम्यान सदर वाहनचालक यांनी मुदत संपण्यापुर्वी दि. ०१/०३/२००१ रोजी मा. औद्योगिक न्यायालय ठाणे येथे कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्बाबत दावा क्र. १०७/२००१ दाखल केला. त्याअनुषंगे मा. सर्वसाधारण सभा दि. २५/०६/२००१ ठराव क्र. ३६९(३) अन्वये सदर चार वाहन चालकांची सेवा कमी करू नये अशी मंजुरी दिलेली आहे. दरम्यान दाव्याचा निकाल महानगरपालिकेच्या बाजूने झाल्यामुळे त्यांनी मा. औद्योगिक न्यायालयाचे दाव्यास मा. उच्च न्यायालयात आव्हान दिले त्यानुसार मा. उच्च न्यायालयाने त्यांना योग्य कायदेशिर कारवाई केल्याशिवाय कामावरून कमी करू नये (Terminate the sevices without following due process of law) त्यामुळे त्यांना महानगरपालिकेने कमी केलेले नाही. परंतु दि. १८/०८/२००७ रोजी शासनाकडील आदेशान्वये महानगरपालिकेचे आस्थापनेवर आठ वाहन चालकांची पदे मंजुर झाली त्या आठ पदांपैकी ५०ऽ प्रमाणे चार पदे सरळ सेवा व चार पदे पदोन्नतीसाठी ठेवण्यात आली. त्यानुसार बिंदुनमावली मा. सहाय्यक आयुक्त (मावक) कोकण भवन, मुंबई यांचेकडून प्रमाणीत करण्यात आल्यानंतर सरळसेवा बिंदू नामावली नुसार फक्त दोन पदे खुल्या प्रवर्गातील सरळसेवेने भरण्यासाठी रिक्त होती. ती रिक्त वाहनचालक पदे सरळसेवेने भरण्यासाठी दि. ०७/१०/२००७ रोजी दै. सागर व सुरज प्रकाश मध्ये जाहिरात प्रसिद्ध करून उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले होते. त्यात गुणानुक्रमे श्री. प्रकाश पांडूरंग पाटील व श्री. सदानंद गोविंद धुरी यांची निवड करण्यात येवून श्री. सुनिल शांताराम लोनुष्टे यांना प्रतिक्षा यादीत ठेवण्यात आले. या सरळसेवेच्या भरती प्रक्रियेत श्री. विलास साळवी यांनी अर्ज केलेला नाही. तरी वरीलप्रमाणे सरळसेवेची भरती प्रक्रिया करण्यात आल्यानंतर श्री. प्रकाश पाटील व श्री. सदानंद गोविंद धुरी

यांना महानगरपालिकेचे आस्थापनेवर दि. २२/११/२००७ रोजीचे आदेशान्वये नेमणूक करण्यात आली. श्री. सुनिल लोनुष्टे हे प्रतिक्षा यादीवर असुन श्री. विलास साळवी यांनी अर्जच केलेला नव्हता.

श्री. प्रकाश पाटील व सदानंद धुरी यांना आस्थापनेवर कायम स्वरूपी नेमणूक करण्यांत आली. त्यांनी न्यायालयातील दावा मागे घेत असल्याबाबत त्यांचे वकीलास कळवविले असुन सद्यस्थितीत चारही वाहनचालकांचा दावा न्यायप्रविष्ठ असल्याने व मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या स्थगिती आदेशान्वये श्री. सुनिल लोनुष्टे व श्री. विलास साळवी या दोन वाहन चालकांचे ठोक मानधन रू. ३०००/- काढण्यांत येत आहे.

सदर प्रकरणी वस्तुस्थिती पहाता महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सरळसेवेने वाहनचालक पदे रिक्त नाहीत तसेच प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे त्यांना कमी करता येत नाही. त्यामुळे श्री. सुनिल लोनुष्टे व श्री. विलास साळवी यांना सदरचे ठोक मानधन हे २००१ पासुन देण्यात येत असल्याने त्यात वाढ करावी या त्यांच्या मागणीचे अनुषंगाने सद्यस्थितीत स्थायी वाहन चालक यांना देण्यात येणाऱ्या वेतनश्रेणीतील किमान वेतन दरानुसार देय होणारे वेतन भत्ते पहता श्री. सुनिल लोनुष्टे व श्री. विलास साळवी यांना रू. ५,०००/- मासिक ठोक मानधन २६ दिवसांकरिता प्रदान करणे्स ही सभा आर्थिक व प्रशासकिय मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. टेरी परेरा. अनुमोदन :- श्री. तुळशीदास म्हात्रे.**

**श्री. मिलन वसंत म्हात्रे ह्यांनी पुढील कारणाकरिता या ठरावास विरोध दर्शविला.**

ठेका पद्धतीवर वाहनचालक या पदावर कार्यरत असलेले श्री. विलास साळवी व श्री. सुनिल लोनुष्टे या वाहनचालकांनी व अन्य दोन वाहनचालकांनी मा. मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका क्र. ५३७७/२००६, दि. २२/०१/२००७ यानुसार त्यांनी चालू असलेल्या याचिकेत त्यांचे म्हणणे मांडून त्यावर मा. न्यायालयाचे आदेश प्राप्त केल्यानंतर मागणी करणे ह्या कारणास्तव मी माझा विरोध या सुचनेद्वारे मांडत आहे.

| अ.क्र. | ठरावाच्या बाजुने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ सदस्य |
|---|---|---|---|---|
| १) | श्री. रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | १) | श्री. मिलन म्हात्रे | निरंक |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | २) | श्रीम. नयना म्हात्रे | |
| ३) | श्री. ॲड. एस. ए. खान | ३) | श्री. शरद केशव पाटील | |
| ४) | श्रीम. शानु गोहिल | ४) | श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे | |
| ५) | श्रीम. सुनिता कैलास पाटील | | | |
| ६) | श्री. शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| ७) | श्री. ध्रुवकिशोर पाटील | | | |
| ८) | श्री. टेरी पॉल परेरा | | | |
| ९) | श्री. प्रशांत पालांडे | | | |

**ठराव बहूमताने मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६४, मिरारोड वॉर्ड क्र. ५२ मधील मिरा पार्क, वैभव अपार्टमेंट कानुंगो, मेडतीया नगर पर्यत खोदलेल्या नाल्यास पिचिंग करणे कामाऐवजी सी.सी. गटार बांधणे कामास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

(सन्मा. सदस्य एस.ए. खान यांनी प्रकरण क्र. ६४ च्या ठरावाचे वाचन केले.)

**एस. ए. खान :-**

मिरारोड वॉर्ड क्र. ५२ मधील मिरापार्क, वैभव अपार्टमेंट कानुंगो, मेडतीया नगर पर्यत पावसाळयापूर्वी कच्चा नाला खोदलेला असून सदर नाल्यास पिचिंग करणे कामी मा. स्थायी समिती सभा दि. ०५/०६/२००८ ठराव क्र. १३ अन्वये प्रशासकीय / आर्थिक मान्यता देण्यात आलेली होती. सदर कामी निविदा मागवून मा. स्थायी समिती सभा दि. १०/०७/२००८ ठराव क्र. २९ अन्वये ठेकेदार मे. सागर एन्टरप्राईजेस यांची निविदा मंजूर करून ठेकेदारास कार्यादेश देण्यात आले होते. सदर नाल्याकरीता विकासकांनी जागा उपलब्ध करून दिल्या असून नाल्यालगत दोन्ही बाजूस विकासकांना कुंपणभिंती बांधावयाच्या असल्याने पिचिंग काम करणे शक्य होत नाही. सदर ठिकाणी पिचिंगने नाला बांधणे कामी रू. १६,५८,४०० /- रकमेचे अंदाजपत्रक मंजूर आहे. सदर नाल्याबाबत संबधित विकासकाशी झालेल्या चर्चेनुसार महानगरपालिकेने रू. १६,५८,४००/- रकमेत पिचिंग ऐवजी सी.सी. नाला स्लॅबसह बांधण्याचे काम महानगरपालिकेने करणे व उर्वरीत काम संबधित विकासकांनी करण्याबाबत संमती दर्शविली आहे. तरी जुनी निविदा रद्द करून सदर ठिकाणी रू.

१६,५८,४००/- या रकमेत पिचिंग ऐवजी सी.सी. गटार महानगरपालिकेमार्फत बांधणे कामास व निविदा मागविणेस नव्याने प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**शानु गोहिल :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव वाचून कायम करण्यात येत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सचिव साहेब, या ठरावाला माझा विरोध आहे. कारण, ज्या ठिकाणी नैसर्गिक स्त्रोतचे नाले होते, जी सरकारी जागा होती ती जागा रेव्हेन्यु मध्ये नावावर लावून घेतले. कशी लावले तो भाग निराळा आहे. त्या ठिकाणी बिल्डींगचे जे काही प्लान आहे ते आपल्या नगररचनाने केलेले आहे पण ते करत असताना नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत जे मिठी नदिकरिता कोर्टाने प्रत्येक शहराकरता निकाल दिले. ते सगळ्यांना बांधिल आहे. अशा जागेवर त्या बिल्डींगचे प्लान पास केलेले आहेत. मागच्या ठरावामध्ये मागे हा ठराव आला होता आणि त्याच्यामध्ये माहिती हक्काचे कागदपत्र तपासुन ही टिपणी आलेली नाही. कारण त्या ठरावात तशी नोंद आहे. तरीसुद्धा हा ठराव तिकडे आणलेला आहे. सरकारी जागेमध्ये सगळे बिल्डींगचे नकाशे पास केले. त्यांला जागा किती सोडली प्लान किती आहेत? किती माळाचे आहेत? काहीही कळायला मार्ग नाही. आणि त्यामध्ये मेन स्त्रोत बंद करून प्लान पास करून मेन नाल्याने स्त्रोत बंद करून हा नाला काढायला घेतला. तो नाला कईक पद्धतीने कमी आहे. त्या करिता माझा विरोध आहे. माझा विरोध मी लेखी नोंदवायला तयार आहे. माझा विरोध नोंदवून घ्या.

**प्रकरण क्र. ६४ :-**

मिरारोड वॉर्ड क्र. ५२ मधील मिरा पार्क, वैभव अपार्टमेंट कानुंगो, मेडतीया नगर पर्यत खोदलेल्या नाल्यास पिचिंग करणे कामाऐवजी सी.सी. गटार बांधणे कामास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. ५९ :-**

मिरारोड वॉर्ड क्र. ५२ मधील मिरापार्क, वैभव अपार्टमेंट कानुंगो, मेडतीया नगर पर्यत पावसाळयापूर्वी कच्चा नाला खोदलेला असून सदर नाल्यास पिचिंग करणे कामी मा. स्थायी समिती सभा दि. ०५/०६/२००८ ठराव क्र. १३ अन्वये प्रशासकीय / आर्थिक मान्यता देण्यात आलेली होती. सदर कामी निविदा मागवून मा. स्थायी समिती सभा दि. १०/०७/२००८ ठराव क्र. २९ अन्वये ठेकेदार मे. सागर एन्टरप्राईजेस यांची निविदा मंजूर करून ठेकेदारास कार्यादेश देण्यात आले होते. सदर नाल्याकरीता विकासकांनी जागा उपलब्ध करून दिल्या असून नाल्यालगत दोन्ही बाजूस विकासकांना कुंपणभिंती बांधावयाच्या असल्याने पिचिंग काम करणे शक्य होत नाही. सदर ठिकाणी पिचिंगने नाला बांधणे कामी रू.१६,५८,४००/- रकमेचे अंदाजपत्रक मंजूर आहे. सदर नाल्याबाबत संबधित विकासकाशी झालेल्या चर्चेनुसार महानगरपालिकेने रू.१६,५८,४००/- रकमेत पिचिंग ऐवजी सी.सी. नाला स्लॅबसह बांधण्याचे काम महानगरपालिकेने करणे व उर्वरीत काम संबधित विकासकांनी करण्याबाबत संमती दर्शविली आहे. तरी जुनी निविदा रद्द करून सदर ठिकाणी रू.१६,५८,४००/- या रकमेत पिचिंग ऐवजी सी.सी. गटार महानगरपालिकेमार्फत बांधणे कामास व निविदा मागविणेस नव्याने प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. एस. ए. खान** **अनुमोदन :- श्री. ध्रुवकिशोर पाटील**

**श्री. मिलन वसंत म्हात्रे ह्यांनी पुढील कारणाकरिता या ठरावास विरोध दर्शविला.**

मिरा भाईंदर क्षेत्रात सोनाली हॉटेलच्या पाठीमागे मौजे भाईंदर सर्व्हे नं. ३५० हा सरकारी भुखंड आहे. सदर भुखंडाचे क्षेत्रफळ हे उड्डाणपुलापर्यंत विस्तारीत आहे. सदर भुखंडात नैसर्गिक नाला अस्तित्वात होता. त्यातुन या क्षेत्रातील पावसाळी पाणी पुर्वापार वाहून जात होते व ते नैसर्गिक नाल्याचे स्त्रोत बंद करुन काही महिन्यापूर्वी एका विकासकाने मोठ्या प्रमाणात माती भराव करुन सदर नैसर्गिक नाला बंद केला आहे. त्यामुळे त्या क्षेत्रातील पावसाळी पाणी व नित्याचे निचऱ्याचे पाणी जाण्याचा नैसर्गिक मार्ग बंद झाला. नैसर्गिक नाला बंद झाल्यामुळे वैभव अपार्टमेन्ट व गीता नगर या इमारतीच्या संरक्षण भिंती तोडून कुत्रिम नाला तोडून तात्पुरत्या स्वरुपात गटार निर्माण करण्याचा महानगरपालिकेचा हा जनतेच्या पैशाचा गैरवापर आहे. तसे न करता सदर भुखंडातून मुळ नाला खोदून तेथे गटार / नाला निर्माण करण्यात यावा व सदर कामाकरिता येणारा अर्थिक खर्च हा त्या विकासकाने उचलावा अशी मी सुचना सदर ठरावास विरोध करुन करीत आहे. त्याची नोंद मनपा प्रशासनाने घ्यावी.

| अ.क्र. | ठरावाच्या बाजुने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ सदस्य |
|---|---|---|---|---|
| १) | श्री. रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | १) | श्री. मिलन म्हात्रे | निरंक |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | २) | श्री. शरद केशव पाटील | |
| ३) | श्री. ॲड. एस. ए. खान | | | |
| ४) | श्रीम. शानु गोहिल | | | |

| अ.क्र. | ठरावाच्या बाजुने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ सदस्य |
|---|---|---|---|---|
| ५) | श्रीम. सुनिता कैलास पाटील | | | |
| ६) | श्री. शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| ७) | श्री. ध्रुवकिशोर पाटील | | | |
| ८) | श्री. टेरी पॉल परेरा | | | |
| ९) | श्री. प्रशांत पालांडे | | | |
| १०) | श्रीम. नयना म्हात्रे | | | |
| ११) | श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे | | | |

**ठराव बहुमताने मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**शरद पाटील :-**

पूढच्या मिटींगमध्ये विषय आणा.

**मा. सभापती :-**

सभा संपली असे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दु. १.४५ वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**